सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, ०३ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३३७ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# SEBI च्या माजी अध्यक्षांविरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश



मुंबई : विशेष लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मुंबईतील न्यायालयाने शेअर बाजारातील फसवणूक आणि नियामक उल्लंघनाच्या आरोपाखाली सेबीच्या माजी अध्यक्षा माधवी पुरी बुच आणि इतर पाच अधिकाऱ्यांविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले. नियामक त्रुटी आणि संगनमताचे प्रथमदर्शनी पुरावे आढळले आहेत. या प्रकरणी निःपक्षपाती चौकशी व्हावी यासाठी एफआयआर नोंदवण्याचे निर्देश विशेष न्यायाधीश शशिकांत एकनाथराव बांगर यांनी दिले. न्यायालयाने तपासावर लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला आहे आणि ३० दिवसांच्या आत अहवाल मागवला आहे.

शेअर बाजारातील व्यवहारांमध्ये पारदर्शकता राखली जाईल आणि नियमांचे पालन केले जाईल याची खबरदारी घेण्याची जबाबदारी सेबीची आहे. पण सेबीच्या अधिकाऱ्यांनी संगनमत केले. त्यांनी बाजारातील फेरफारला चालना दिली आणि निर्धारित निकषांची पूर्तता न करणाऱ्या कंपनीची लिस्टिंग करण्यास परवानगी देऊन कॉर्पोरेट फसवणुकीला चालना दिली. यामुळे आर्थिक फसवणूक, नियामक नियमांचे उल्लंघन आणि भ्रष्टाचार झाला; अशी तक्रार प्रसारमाध्यमातील एका प्रतिनिधीने केली. या तक्रारीआधारे केलेल्या प्राथमिक सुनावणीअंती विशेष न्यायाधीश शशिकांत एकनाथराव बांगर यांनी चौकशीसाठी एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले.

# राहुल गांधींसोबत दिसलेल्या महिलेचा मृतदेह सुटकेसमध्ये आढळला



रोहतक : काँग्रेसचे लोकसभेतील खासदार राहुल गांधी यांच्यासोबत भारत जोडो यात्रेवेळी दिसलेल्या महिलेचा मृतदेह बेवारस अवस्थेत रस्त्याच्या कडेला फेकून दिलेल्या सुटकेसमध्ये आढळला. या प्रकरणी हरियाणातील रोहतक जिल्ह्यातील सांपला पोलीस तपास करत आहेत. पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटवली आहे. सुटकेसमध्ये आढळलेला मृतदेह हिमानी नरवाल नावाच्या काँग्रेसच्या महिला सदस्याचा आहे.

पांढरा पंजाबी ड्रेस परिधान केलेल्या अवस्थेतला हिमानी नरवाल यांचा मृतदेह सुटकेसमध्ये आढळला. मृतदेह सडण्यास सुरुवात झाली होती. यामुळे सुटकेस जवळ जाताच पोलिसांना दुर्गंधी जाणवू लागली. मृतदेहाच्या मानेभोवती ओढणी गुंडाळलेली दिसली. यामुळे गळा ओढणीने आवळून हत्या करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

हिमानीच्या वडिलांनी आठ वर्षांपूर्वी आत्महत्या केली होती. आता हिमानीची हत्या झाली आहे. हिमानीची आई तिच्या भावासोबत दिल्लीत आहे, तिला घटनेची माहिती देण्यात आली आहे. काँग्रेसचे काम करत असलेली हिमानी रोहतकमध्ये भाड्याच्या घरात वास्तव्यास होती. हिमानीचा मृतदेह सोनीपतमधील बस स्टँड चौकाजवळ काळ्या रंगाच्या सुटकेसमध्ये आढळला.

सोशल मीडियात हिमानीचा दोन दिवसांपूर्वीचा एक फोटो व्हायरल होत आहे. या फोटोत हिमानीच्या हातावर मेंदी दिसत आहे. यामुळे सोहळ्याच्या ठिकाणी काही घडले का याचा तपास पोलिसांनी प्राधान्याने सुरू केला आहे. इतर शक्यतांचीही तपासणी केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## जुन्या वाहनांना दिल्लीत पेट्रोल, डिझेल मिळणार नाही

नवी दिल्ली : दिल्लीतील १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांना ३१ मार्चनंतर पेट्रोल व डिझेल मिळणार नाही, अशी घोषणा पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंग सिरसा यांनी केली. राजधानीतील वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी मोठी हॉटेल्स, विमानतळ, बांधकाम स्थळांना प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी अँटी-स्मॉग गन बसवणे बंधनकारक असणार आहे. क्लाउड सीडिंगसाठी आवश्यक असलेली परवानगी घेऊ व दिल्लीमध्ये जेव्हा गंभीर प्रदूषण असेल तेव्हा क्लाउड सीडिंगद्वारे पाऊस पाडता येईल आणि प्रदूषण नियंत्रित करता येईल याची आम्ही खात्री करू, अशीही माहिती सिंग सिरसा यांनी दिली.

## वकिलांना काळ्या कोटपासून ३० जूनपर्यंत सूट!

पुणे : उन्हाळी मोसमाला सुरुवात झाली असून राज्यभरात नागरिकांना आता उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. सकाळी काहीसा गारवा दर दुरी कडाक्याच्या उन्हामुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत असल्याचे समोर येत आहे. अशातच काळा रंग सूर्यप्रकाश शोषून घेत असल्यामुळे उन्हाळ्यात काळ्या रंगाचे कपडे वापरणे शक्यतो टाळले जाते. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने वकिलांना आता काळ्या कोटपासून सुट्टी दिली आहे.

वकील आणि काळा कोट हे समीकरण ठरलेलचं आहे. मात्र, उन्हाचा चटका वाढल्यानंतर पारंपरिक पोशाखात न्यायालयीन कामकाज करणे वकील वर्गाला जवळपास अशक्य होते. काळा रंग सूर्यप्रकाश शोषून घेत असल्यामुळे उन्हाळ्यात काळ्या रंगाचे कपडे वापरणे शक्यतो टाळले जाते. त्या अनुषंगाने सिव्हिल मॅन्युअलच्या प्रकरण २२ मधील परिच्छेद ६३६ नुसार वकिलांना कोट वापरास सूट देण्यात आली असून, येत्या तीस जूनपर्यंत न्यायालयाने कामकाजात काळ्या कोटचा वापर ऐच्छिक असणार आहे.

न्यायालयात पक्षकारांची बाजू मांडणाऱ्या वकिलांना आपल्या पेशाची ओळख सांभाळण्यासाठी दिवसभर काळ्या कोटातच वावरावे लागते. तरीही उन्हाळ्यात काळ्या कोटाचा त्रास होऊ नये, यासाठी यंदा १ मार्च ते ३० जून हे तीन महिने कोट न वापरण्याची मुभा दिली आहे.

# आयटीआयमध्ये सुरु होणार डिजिटल लायब्ररी

पुणे : राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना उपयुक्त सुविधा निर्माण केली जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून आयटीआयमध्ये डिजिटल लायब्ररी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. आयटीआयमध्ये प्रशिक्षण घेताना विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्य आणि वाचनाची आवड वृध्दिंगत होणे आवश्यक आहे. आधुनिक काळात डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे पारंपरिक ग्रंथालयांबरोबरच डिजिटल लायब्ररीची गरज निर्माण झाली. डिजिटल लायब्ररी विद्यार्थ्यांना कधीही आणि कुठूनही ऑनलाइन शैक्षणिक साहित्य वाचण्याची सुविधा देते. डिजिटल लायब्ररीमुळे विद्यार्थ्यांना एकाचवेळी अनेक संसाधनांचा वापर करता येतो, माहितीचे अद्ययावतीकरण शक्य होते, जागेची बचत होते, पुस्तकांच्या देखभालीचा खर्च कमी होतो असे अनेक फायदे आहेत. अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून विद्यार्थ्यांना डिजिटल साहित्य उपलब्ध करून देणे शक्य आहे.

या पार्श्वभूमीवर आयटीआयमधील डिजिटल लायब्ररी सुविधेचा सर्व विद्यार्थ्यांना होणारा फायदा विचारात घेऊन सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये डिजिटल लायब्ररी सुरू करण्यास मान्यता देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले. मुंबई, अमरावती येथील आयटीआयपासून सुरुवात योजनेअंतर्गत सुरुवातीला मुंबईतील नेताजी सुभाषचंद्र बोस शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि अमरावती येथील संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे डिजिटल लायब्ररी सुरू केल्या जाणार आहेत. त्यासाठी एकूण ९९ लाख ९६ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.






सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## शेती खरेदी-विक्री व्यवहार; तेरी भी चूप, मेरी भी चूप ! चौकशीची सुई पुढे सरकेना

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : पैठण तालुक्यातील तोंडोळी, लोहगांव भागात अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनीची बेकायदेशीर खरेदी-विक्री झाल्याचे प्रकरण एका तक्रारीवरून समोर आले आहे. केवळ नोटरी करून जमिनी लिहून घेणाऱ्या सुभाष गोपालचंद श्रॉफ यांच्याविरुद्ध अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्यामुळे ग्रामस्थांनी संशय व्यक्त केला आहे. तोंडोळी शिवारातील सखाराम तुळशीराम तांबे यांच्या शेतजमिनीची खरेदी करून खरेदीदाराला इसार पावती करून दिल्याच्या घटनेवरून हा प्रकार उघडकीस आला.

याप्रकरणी मंगल सखाराम तांबे व संतोष नामदेव जगताप यांनी ३० जानेवारी २५ रोजी भीमशक्ती या सामाजिक संघटनेमार्फत बिडकीन पोलिसांकडे लेखी तक्रार केली आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. एन. काटकर, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : १२३/२०२५ पुढील तारीख: ०१/०४/२०२५

अर्जदार : १–मैमुना निसार शाह, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. हाऊस नं. १०/६९, सैलानी शहा दर्गा जवळ, खिडकी–का–बंगला, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर, औरंगाबाद २–मुख्तार निसार शाह, वय ४७ वर्षे, धंदा मजुरी, रा. संदर ३–अन्सार निसार शाह, वय ४३ वर्षे, धंदा मजुरी, रा. सदर ४–रुकसानाबी खाजा शाह, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपरखेडा, कन्नड, ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर औरंगाबाद ५– अफसाना मुबारक शेख, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. आर.एच.ए.८, हरीश्चंद्र रेसीडेन्सी, गट नंबर १४०/पी, प्लॉट नंबर १५/१६, सिडको, वाळूज, महानगर–१, तिसगांव बजाजनगर, मिडल वाळूज, औरंगाबाद

– विरुध्द –

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. (Bombay Regulation Act VIII1827, SEC.2)

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. व्ही. के. मोहिते, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ चे पती व अर्जदार क्रमांक २ ते ५ यांचे वडील नामे निसार अहेमद शाह हे दिनांक २२.७.२०२३ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झाले आहेत. सोबत मयतांचे नगर पालिका कार्यालय कन्नड, ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी या न्यायालयाच्या अवलोकनासाठी वंशावळ अर्जदारांनी दिली आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार हे मागणी करीत आहे, सबब अर्जास कारण ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी घडले आहे. अर्जदार यांनी मुळ सोबत स्वतःचे आधार कार्ड तसेच नगर पालिका कार्यालय कन्नड ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र, व वारसाचे प्रमाण पत्र विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल करीत आहे. अर्जदार हे या न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार है मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सवय या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक २७.०२.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : २७.०२.२०२५

आदेशावरुन

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कंन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दि. किरकोळ. अर्ज.के. १०७/२०२५.

पुढील तारीख १९/०३/२०२५.

अर्जदार : १. भागाबाई भ्र. ताराचंद राजपुत, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. औराळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. स्वरुपचंद पिता ताराचंद राजपुत, वय ५२वर्षे, धंदा खाजगी नौकरी, रा. औराळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. प्रताप पिता ताराचंद राजपुत, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. औराळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. पोपट पिता ताराचंद राजपुत, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. औराळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. मयनाबाई भ्र. संजय सतावन, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. खापरखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार :– महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज :– भारतीय वारसा अधिनियम १९२५ कलम ३७२ प्रमाणे वारसा हक प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत ताराचंद नंदराम राजपुत यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र.५ ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्र. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत ताराचंद नंदराम राजपुत यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे ताराचंद नंदराम राजपुत हे मौजे औराळा, ता. कन्नड येथील रहिवाशी होते. मयत ताराचंद नंदराम राजपुत हे दि.२६/११/२०१८ रोजी मौजे औराळा ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे वृद्धपकाळाने मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ चे मयत पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील यांच्या नावाने असलेले वाहन ज्याचा तपशील पुढील प्रमाणे अ वाहन क. MH20EE6078 महिंद्रा ॲण्ड महिंद्रा 585 DI POWER Tractor ज्याचा चेसिस नं. MBNADANBEHNM00539 व इंजिन NHM6CAE0203 ज्याचा मुल्यांकन १,२०,०००/– रुपये, व वाहन क्र. MH20DE2309 महिंद्रा ॲण्ड महिंद्रा BOLERO PICKUP ज्याचा चेसिस नं, MA1ZN2GHKE1L87633 व इंजिन GHE1L70681 ज्याचा मुल्यांकन १,५०,०००/– रुपये वरील प्रमाणे मयताच्या नावे असलेली परिच्छेद क्र. ४ अ मध्ये उल्लेखित वाहन ही अर्जदार क्र. ४ याच्या नावे करण्यासाठी अर्जदार क्र. १ ते ३ व ५ यांची संमतीने असून तसेच परिच्छेद क्र. ४ ब मध्ये उल्लेखित वाहन ही अर्जदार क्र. ३ याच्या नावे करण्यासाठी अर्जदार क्र. १, २ व ४ व ५ यांची संमतीने नावे करण्यासाठी वारस हक्क प्रमाणपत्र मा. न्यायालयातून प्राप्त करावे असे संबंधित अधिकाऱ्याने सांगितल्यामुळे व वारस हक्क प्रमाणपत्र कार्यालयात दाखल केल्याशिवाय वर उल्लेखित वाहन नामंतर करता येऊ शकत नाही. करिता सदरील अर्ज वारसा हक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल करीत आहे. मा. न्यायालयाच्या अवलोकनार्थ योग्य ते कागदपत्र सादर केले आहे. मयत ताराचंद नंदराम राजपुत हे मौजे औराळा, ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र.१ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.१०/१२/२०२४ रोजी मौजे औराळा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नाव वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०२/२०२५.

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## नांदूर-मधमेश्वर कालवा सिंचन आवर्तनावर टांगती तलवार

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : शुक्रवार, २८ फेब्रुवारी रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडलेल्या कालवा सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत नांदूर–मधमेश्वर कालवा उन्हाळी शेती सिंचन आवर्तनाबाबत ठोस निर्णय अपेक्षित होता. परंतु, तसे काही एक झाले नाही. नाशिक विभागाने पाणी उपलब्ध करून दिले तरच शेती सिंचनासाठी आवर्तन दिले जाईल, अशी टांगती तलवार ठेवण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत नांदूर–मधमेश्वर कालवा गंगापूर, वैजापूर, कोपरगाव भागातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कांदा, गहू, भाजीपाला, फळबाग लागवड केलेली आहे. विशेषत: कांदा व भाजीपाला पिकांना एप्रिल महिन्यात आवर्तन नाही मिळाल्यास शेतकऱ्यांचे हजारो कोटी रुपयाचे नुकसान होणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. वरील भागातील धरणे पूर्णक्षमतेने भरलेली असताना सुद्धा नांदूर–मधमेश्वर कालव्यास पाणी न सोडण्याचा निर्णय हा अन्यायकारक आहे. आवर्तन सोडण्याबाबत त्वरित निर्णय न झाल्यास आधार शेतकरी जलदूत समिती व शेतकरी यांच्या वतीने तीव्र छेडण्यात येईल, असा इशारा आधार शेतकरी जलदूत समितीचे अध्यक्ष तथा कालवा सल्लागार समितीचे सदस्य पंडितअण्णा शिंदे, सोन्याबापू शिरसाठ, तन्मय कांबळे, कृष्णा पाटील, रवी सोमवंशी, मंदाताई नावले, संदीप रक्ताटे, कृष्णा कुंजीर, अनितातांई चोभे, संजय गुडदे आदींसह परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

### जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.ए.आय.आवटी मॅडम) क.स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. ११९/२०२५

अर्जदार : १. किसन पि.बाळाजी जाधव वय–६८ धंदा–शेती २. भिमदेव पि.बाळा जाधव वय–५२ धंदा–शेती ३. ज्ञानदेव पि. बाळा जाघव वय ४६ धंदा–शेती ४. नामदेव पि.बाळा जाधव वय–६२ धंदा–शेती ५. मुरलीधर पि.बाळा जाधव वय–७६ धंदा–शेती सर्व रा. हिवरखेडा (गौ.) ता. कन्नड जि. औरंगाबाद ६. विमल भ्र. फकिरचंद राठोड वय ५३ धंदा घरकाम रा. – एन–९, एम–२,१२/२ संत ज्ञानेश्वर नगर हडको, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ७. कमल भ्र. नामदेव राठोड वय–४९ धंदा–घरकाम रा. जैतखेडा तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद

–: विरूध्दः–

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत..

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ८ यांचे वडील मयत नामे बाळा पि.पुनाजी जाधव यांचा मृत्यु दि. १८/१०/१९८६ रोजी मौजे हिवरखेडा (गौ.) ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून मयताची पत्नी भानीबाई भ्र.बाळा जाधव ही देखील दि. १४/८/२०२४ रोजी मयत झालेली आसुन मयतास केवळ अर्जदार क. १ ते ८ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत बाळा पि. पुनाजी जाधव यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच यातील अर्जदार क. २ भिमदेव पि.बाळा जाधव यांचा मुलगा नामे अक्षय पि.भिमदेव जाधव यांस शासकीय नोकरी मिळणेसाठी मे. जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथुन प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त प्रमाणपत्र काढण्यासाठी इतर शासकीय निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभघेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार हे मयत बाळा पि.पुनाजी जाधव यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्ग्रह्य धरला जाणार नाही.

करीता आज दि. २७/०२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्कयानिशी दिले आहे

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. एन. काटकर, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ म्नर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : १२९/२०२५ पुढील तारीख : १५/०४/२०२५

अर्जदार : १–सिंधुबाई भ्र. संजु उर्फ संजय शिरसे, वय ४५ वर्षे, धंदा शेती/घरकाम, रा. माळीवाडा, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर २–संदीप पिता संजु उर्फ संजय शिरसे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. माळीवाडा, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर ३–ज्योती पिता संजु उर्फ संजय शिरसे, लग्ना पुर्वीचे नांव । ज्योती भ्र. गणेश सोनवणे (लग्ना नंतरचे नांव वय २७ वर्षे, धंदा शेती/घरकाम, रा. ताडपिंपळगांव, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर

– विरुध्द –

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. (Bombay Regulation Act VIII1827, SEC.2)

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. आर.डी. राऊत, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार नंबर १ ही मयत संजय पिता आसाराम शिरसे यांची पत्नी आहे. अर्जदार क्रमांक २ व ३ हे मयत संजयचे अनुक्रमे मुलगा व मुलगी आहे. अर्जदार क्रमांक २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ बहीण असून अर्जदार क्रमांक १ ही त्यांची जन्मदाती आई आहे. मयतास आई वडील नाही. अर्जदार १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत या व्यतीरिक्त ईतर कुणीही कायदेशीर अथवा बेकायदेशीर वारस नाही. अर्जदार क्रं. १ चे पती व अर्जदार २ व ३ चे वडील नामे मयत संजय आसाराम शिरसे हे ०८.०१.२०२५ रोजी राहत्या घरी माळीवाडा, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर येथे मरण पावले आहे, त्या बाबतचे मयताचे मृत्यु प्रमाण पत्र दिनांक २२.०१.२०२५ रोजीचे नगर पालिका कन्नड चे मुळ अर्जा सोबत अर्जदारांनी दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ते ३ यांना मयत संजय आसाराम शिरसे यांच्या मृत्यु पश्चात सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या शासकीय निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्यामुळे त्या सर्व कागदपत्राची पुर्तता केली आहे, मा. न्यायालयाच्या वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्यामुळे सदरील प्रकरण मा. न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्यास दिनांक १५.०२.२०२५ रोजी कारण घडले आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असून मयत संजय आसाराम शिरसे हे देखील मृत्यु समयी मे. न्यायालयाचे कक्षेतच रहात होते व अंत्य विधी देखील मे. न्यायालयाचे कक्षेतच झालेला आहे. सबब मे. न्यायालयास सदरचा अर्ज चालविण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयनाचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारमा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक २७.०२.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : २७.०२.२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दि. किरकोळ, अर्ज.कं. ७४/२०२५. पुढील तारीख १२/०३/२०२५.

अर्जदार : १. यशोदा भ्र. नागेश्वर सातदिवे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. देवगांव रंगारी, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. तेजश्री पिता नागेश्वर सातदिवे, वय १३ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. जन्मदाती आई अर्जदार क्र. १ ३. देवांश पिता नागेश्वर सातदिवे, वय ८ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. जन्मदाती आई अर्जदार क्र. १

विरुद्ध

गैरअर्जदार : १. महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद. २. भिमसेन किसनराव सातदिवे, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. राजवाडा, देवगांव रंगारी, ता. कन्नड जि. औरंगाबाद. मो.नं. ९८६०२२९६३४. ३. पल्लवी भ्र. सुभाष केदारे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. एल. आय.जी. कॉलनी, बिल्डींग नं. २८/४९९, कोकण वसाहत, बिर्ला कॉलेज जवळ, चिकणघर, कल्याण पश्चिम, जि. ठाणे मो.नं. ९८९२८६७६४४. ४. गौतमी भ्र. प्रभाकर साळवे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. एन २, ठाकरे नगर, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद. मो. नं.९११२९५३६७८ ५. माधवी भ्र. लक्ष्मण थोरात, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. बेस्ट प्राईज मॉलच्या मागे, कांचनवाडी, बिड बायपास रोड, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद. मो.नं. ९८४८००४९३८.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, मयत किसनराव मरिबा सातदिवे व मयत शोभाबाई भ्र. किसनराव सातदिवे हे मुळचे मौजे देवगांव रंगारी ता. कन्नड येथील रहिवाशी होते. मयत किसनराव मरिबा सातदिवे हे दिनांक २१/०५/२०२१ रोजी मरण पावले असून त्यांची पत्नी शोभाबाई भ्र. किसनराव सातदिवे ही देखील दिनांक ०८/०४/२०२१ रोजी मयत झाली आहे. मयतास गैरअर्जदार क्र. २ भिमसेन व अर्जदार क्र. १ चा पती नागेश्वर किसनराव सातदिवे असे दोन मुले होती व आहे. तसेच मयतास गैरअर्जदार क्र. ३ ते ५ ह्या विवाहित मुली आहेत. त्यापैकी नागेश्वर किसनराव सातदिवे हा दिनांक २९/०५/२०२१ रोजी मयत झाला आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे अज्ञान असून अर्जदार क्र. १ ही त्यांची जन्मदाती आई असून अज्ञान पालनकर्ती आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. मयत किसन मरिबा सातदिवे हे दिनांक २१/०५/२०२१ रोजी मौजे देवगांव रंगारी येथे मयत झाले असून शोभाबाई भ्र. किसन सातदिवे ही दिनांक ०८/०४/२०२१ रोजी देवगांव रंगारी येथे आजारपणामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ व गैरअर्जदार क्र. २ ते ५ यांना मयत किसन मरिबा सातदिवे व शोभाबाई भ्र. किसन सातदिवे यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ३ व गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. मयत किसन मरिबा सातदिवे व शोभाबाई भ्र. किसन सातदिवे हे मौजे देवगांव रंगारी, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ३ व गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक ०५/०१/२०२५ रोजी मौजे देवगांव रंगारी ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळविण्यासाठीचा अर्ज इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक :– २७/०२/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड,

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. १३०/२०२५ पुढील तारीख ०८/०४/२०२५

अर्जदार : १– कृष्णा भावराव मोकासे वय– ५४ वर्षे, धंदा– नौकरी, रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद २– मनिराम भावराव मोकासे वय ८० वर्षे, धंदा– काही नाही, रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३– सखाराम भावराव मोकासे वय ६४ वर्षे, धंदा– शेती, रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४– सांडू भावराव मोकासे (मयत) (वारस) ४–१ रेनाबाई सांडु मोकासे वय ७८ वर्षे, धंदा– काही नाही, रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४–२ राजु सांडु मोकासे वय ४५ वर्षे, धंदा– शेती, रा. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४–३ शिवाजी सांडु मोकासे वय– ४२ वर्षे, धंदा– शेती, रा. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४–४ अमोल सांडु मोकासे वय– ४० वर्ष, धंदा– शेती, रा. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५– तुकाराम भावराव मोकासे (मयत) (वारस) ५–१ लक्ष्मीबाई तुकाराम मोकासे वय ६३ वर्षे, धंदा– घरकाम, रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५–२ सुरेश तुकाराम मोकासे वय– ४४ वर्षे, धंदा– शेती, रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५–३ सुभाष तुकाराम मोकासे वय– ४० वर्ष, धंदा– शेती, रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५–४ संगीता नारायण कोल्हे वय ४२ वर्षे, धंदा– घरकाम, रा. करंजखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद ६– कडुबाई नारायण डाहाके, वय ७० वर्षे, धंदा– घरकाम, रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद ७– निर्मलाबाई सुभाष बोराडे, वय ६५ वर्षे, धंदा– घरकाम, रा. उंडनगाव ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद ८– विमल दिलीप धनवई वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. उंडनगाव ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद ९– राहीबाई भावराव मोकासे वय ८५ वर्षे, धंदा घरकाम रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु.ए. वारे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ते ८ हे आपसात सख्खे भाऊ–बहीन असुन अर्जदार क्र. ९ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ८ यांचे वडील, अर्जदार क्र. ९ यांचे पती व अर्जदार क्र. ४–१ व ५–१ चे सासरे तसेच अर्जदार क्र. ४–२ ते ४–४ व ५–२ ते ५–४ यांचे आजोबा नामे भावराव बुढाजी मोकासे हे होते ते दिनांक १८/०४/१९९९ रोजी मौजे पिशोर येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ व ६ ते ८ यांचा भाऊ व अर्जदार क्र. ९ यांचा मुलगा अर्जदार क्र. ४ हा दिनांक ३०/०८/१९९२ रोजी मयत झालेला आहे त्यांचे अर्जदार क्र. ४–१ ते ४–४ हे वारस आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ व ६ ते ८ यांचा भाऊ व अर्जदार क्र. ९ यांचा मुलगा, अर्जदार क्र. ५ हा देखील दिनांक २१/१२/२०१५ रोजी मयत झालेला असून त्यांचे अर्जदार क्र. ५–१ ते ५–४ हे वारस आहे. सोबत मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे.

अर्जदार यांना मयत भावराव बुढाजी मोकासे यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच, विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी, तसेच पिशोर शिवारात मयताच्या नामे असलेली जमीन ही अंजना प्रकल्प धरणात संपादीत झाल्याने धरणग्रस्त प्रमाणपत्र काढण्यासाठी सदरील वारस प्रमापत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र. १ ते ९ व ४–१ ते ४–४ तसेच ५–१ ते ५–४ हे मयताचे कायदेशीर वारस आहे, यांच्या व्यतीरिक्त नवतास इतर कोणीही वारस नाहीं.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास. अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन.

दिनांक २७/०२/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

### जाहीर प्रगटन

**विद्यमान श्रीमती व्ही.एन. काटकर मॅडम साहेब, दिवाणी न्यायाधीश' क' स्तर साहेब कन्नड, यांचे न्यायालयात**

सी.एम.ए. ९३/२०२५ पुढील तारीख २४/०३/२०२५

अर्जदार :– १) भाऊसाहेब रामचंद्र आहेर, वयः ५१ वर्ष धंदाः शेती, रा खामगाव, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), २) आसराबाई रामचंद्र आहेर, वयः ८२ वर्ष, धंदाः घरकाम, रा खामगाव, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ३) जनाबाई चिंधा भगत, वयः ७६ वर्ष, धंदाः घरकाम, रा चिकटगाव, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर)

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय : वारस हक्क प्रमाणपत्र (लीगल हेअरर्शिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री संदीप ए शिरसे यांचेमार्फत या न्यायालयात अर्जदार ही वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदारांचे मयत वडील/ पती नामे कै. रामचंद्र दगडू आहेर असून त्यांचा मृत्यू दिनांक २२/०८/१९८४ रोजी खामगाव तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेल्या आहे ग्रामपंचायत देवगाव रंगारी तालुका कन्नड येथील मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे. सदरील प्रकरणात मयत कै. रामचंद्र दगडू आहेर यांचे अर्जदार १, मुलगा असून, अर्जदार क्रमांक २ पत्नी तसेच अर्जदार क्रमांक ३ ह्या मुलगी आहेत. सदरील अर्जदाराशिवाय मयत कै. रामचंद्र दगडू आहेर यांना इतर कोणीही वारस नाही तसेच रा खामगाव, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे शैक्षणिक अथवा सरकारी कार्यालय (तलाठी/ग्रामपंचायत, तहसील इत्यादी.) यासाठी अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केले आहे. सबब अर्ज दाखल करण्यास कारण घडले..

सबब या जाहीर प्रकटना द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कुणाचाही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत मा. न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप न आल्यास वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

दिनांक २४/०२/२०२५

आदेशावरून

क. लिपिक सहायक अधीक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय क स्तर कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. ए.आर आवटी मॅडम दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र. ५०/२०२५

अर्जदार : १) बसंताबाई भ्र. रविंद्र वाघ, २) उपाबाई भ्र. रमेश लोंढे ३) आशाबाई भ्र. विशाल लोंढे, ४) ज्योतीबाई भ्र. संजय बगोले, ५) संतोष कचरु जाधव (मयत) वारस ५–१) दिपक पि. मंतोष जाधव, ५–२) करण पि. संतोष जाधव, ५–३) आरती भ्र. शिवा मिमरोट, ५–४) सोनाली भ्र. अनिल शेवाळे, ५–५) सुमन श्र. संतोष जाधव,

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अथर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ डी. के. साळवे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहीन असुन अर्जदार क्र. ५ हा मयत झालेला आहे. त्याचे अर्जदार क्र. ५–१ ते ५–५ हे वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. ५–१ ते ५–४ यांचे आजोबा तसेच अर्जदार क्र. ५–५ यांचे सासरे नामे कचरु खुशालचंद जाधव हे होते ते दिनांक २०/०१/२०२३ रोजी राहत्या घरी मौजे कन्नड येथे मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या आई अर्जदार क्र. ५–१ ते ५–४ यांच्या आजी व अर्जदार क्र. ५–५ यांच्या सासु नामे लक्ष्मीबाई कचरू जाधव या होत्या त्या देखील दिनांक ०८/१०/२०२४ रोजी राहत्या घरी मयत झाल्या आहे. तसेच अर्जदार क्र. ५ नामे संतोष कचरु जाधव हा अर्जदार क्र. १ ते ४ यांचा भाऊ अर्जदार क्र. ५–१ नं ५–४ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. ५–५ यांचे पती म्हणजच मयत कचर खुशालचंद जाधव व मयत लक्ष्मीबाई कचरु जाधव यांचा मुलगा होता तो देखील दिनांक १३/११/२०२३ रोजी मयत झालेला आहे त्याचे त्यांचे अर्जदार क्र. ५०१ ते ५–५ वारस आहे, सोबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे.

अर्जदार यांना मयत लक्ष्मीवाई कचरू जाधव यांचे वारस प्रमाणपत्र हे शार्साकय तसेच निमशार्माकय, तलाटी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून येणे अगे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र. १ ते ५–५ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, अर्जदार क्र. १ ते ५–५ हे मयताचे कायदेशीर वारय आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन. दिनांक २७/०२/२०२५

आदेशावरुन

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. ए.आर.आवटी मॅडम सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. १३१/२०२५

अर्जदार :– १– गणेश रमेश मढीकर, वय ४१ वर्ष, धंदा– शेती, २– सुरेश रमेश मढिकर, वय– ३९ वर्षे, धंदा– शेती. ३– दिनेश रमेश मढीकर, वय ३५ वर्षे, धंदा शेती, सर्व रा. देवगाव (रं) ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ४– नंदा भ्र. राम दाभाडे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम. रा. सिल्लोड ता. सिल्लोड जि. औरंगाबाद ५– मालनबाई भ्र. रमेश मढीकर, वय ६० वर्षे, धंदा– घरकाम, रा. देवगाव (रं) ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु.ए.वारे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की. अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ–बहीन असून अर्जदार क्र. ५ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. ५ यांचे पती नामे रमेश वामनराव मढीकर हे होते ते दिनांक ०४/०७/२०२२ रोजी राहत्या घरी मौजे देवगाव (रं) ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. त्यांचे अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहे.

अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध शासकीय, निमशाकीय योजनेचा लाभघेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे सांगीतल्यावरुन अर्जदार हे वारस प्रमाणपत्राची मागणी करत आहे. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर. आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर कराया. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन,

दिनांक २७/०२/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## शिवण्यातील पेट्रोल पंपवरुन चोरी गेलेला एक लाख विस हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत !

तभा वृत्तसेवा

अजिंठा दि, २ मार्च : शिवणा (ता. सिल्लोड ) येथील अजिंठा – बुलढाणा मार्गावरील सद्गुरु पेट्रोल पंपवरून १लाख २० हजार रुपयाची चोरीस गेल्याची घटना शुक्रवारी २८ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ ३० वाजेच्या सुमारास घडली होती . अखेर १२ तासाच्या आत शुक्रवारी सायंकाळी अजिंठा पोलिसांनी चोरी करणाऱ्या पंपावरील एका अल्पवयीन कर्मचाऱ्याला ताब्यात घेऊन १ लाख २० हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केली आहे .

याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार सिल्लोड तालुक्यातील शिवणा येथील व्यापारी चंदन गुप्ता यांच्या पेट्रोल पंपच्या ऑफिस मधील लोखंडी कपाटाचे कुलूप तोडून आतील १ लाख २० हजार रुपये आणि हिशोबाचे रजिस्टर चोरून नेले होते .

चंदन गुप्ता यांनी दिलेल्या तक्रारीवरून अजिंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता पुढील तपास उपविभाग सिल्लोड येथील मा.उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेश कुमार कोल्हे व अजिंठा पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक अमोल ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली

उपनिरीक्षक धम्मदीप काकडे यांचे कडे दिला. यांनी तात्काळ पोलीस स्टेशनचे पोलीस हेडकॉन्स्टेबल बाबा चव्हाण कृष्णा ठाकरे,महिला पोलिस अंमलदर सुरेखा काळे यांचे तपास पथक नेमून घटनास्थळी पाठवले घटनास्थळी जाऊन दोन संशयीतांना ताब्यात घेतले . त्यांना विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यातील एका अल्पवयीन मुलाने मी लॉक उघडून पैसे व रजिस्टर चोरी केल्याचे कबुली केल्याने पोलीस उपनिरीक्षक

धम्मदीप काकडे यांनी सदर मुलाचे वडील यांना पोलीस स्टेशनला बोलावून घेऊन त्यांना सदर घटनेची माहिती सांगितली व त्यांना यातील अल्पवयीन मुलगा व दोन पंचाना सोबत घेऊन घटनास्थळावर गेल्यानंतर अल्पवयीन बालकाने दाखवलेल्या पेट्रोल पंपाच्या मागे असलेल्या शेतात पत्र्याच्या शेड जवळ लपवून ठेवलेले पैसे व रजिस्टर असा एकूण एक लाख वीस हजाराचा मुद्देमाल हस्तगत करून अजिंठा येथील पोलिसांनी बारा तासाचे आत गुन्हा उघडकीस आले आहे.

## साई मंदिर विकास कामास निधी कमी पडू देणार नाही : पालकमंत्री संजय सिरसाठ



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १ जानेवारी : साई बाबांच्या पावन पदस्पर्शाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र धुपखेडा येथील साई मंदिराचा लवकरच तिर्थक्षेत्र विकास योजनेमध्ये समावेश करुन येथील विकास कामांना निधी कमी पडू देणार नाही असे वक्तव्य पालकमंत्री संजय सिरसाठ यांनी आज धुपखेडा (ता पैठण) येथे साई सेवा साधनाश्रमाच्या वर्धापन दिनानिमित्त आज आयोजित कार्यक्रमात केले.

श्रीक्षेत्र धुपखेडा येथे स्वामी बलदेव भारती यांनी २४ वर्षांपूर्वी साई सेवा साधनाश्रमाची स्थापन केली व या साधनाश्रमाच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. या साधनाश्रमाच्या भुमी पुजनापासून प्रत्येक घटनेचा मी साक्षीदार असुन साई बाबांच्या शिकवणी नुसार श्रध्दा आणि सबुरी ठेवलीच पाहीजे. साईबाबांनी मला भरपूर दिले असुन मंत्रीपदाच्या माध्यमातून या पवित्र ठिकाणाच्या विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री संजय सिरसाठ म्हणाले.याप्रसंगी व्यासपीठावर स्वामी बलदेव भारती , साध्वी दुर्गाताई आपशिंदे , तहसीलदार सारंग चव्हाण, माजी महापौर विकास जैन, सरपंच शिवराज भुमरे , सेवानिवृत्त तहसीलदार राम मिरासे , सुनिल इंगळे , ह भ प एकनाथ महाराज जाधव, अशोक कमल पाल आदींची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान साई सेवा साधनाश्रमाच्या वर्धापन दिनानिमित्त मागील सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह, साई चरित्र पारायण , किर्तन आदी विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुदाम चव्हाण , आशा चव्हाण , रायभान खणसे , दादासाहेब खणसे , मंगेश खाटीक , वासुदेव शेट्टी, निता कांबळे , गजानन कांबळे , रविंद्र शेळके गणेश सपकाळ , साई मतकर, गिधाणे, कृष्णा जोशी आदींनी परिश्रम घेतले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निता कांबळे यांनी केले.

## संघ हीच जीवनगाथा



अलक:- (५६) पांचप्रण

आज १५ ऑगस्ट १९२२. आपल्या भारत मातेच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आपले पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून पांच प्रण सांगितले. (१) विकसित भारतासाठी कटिबद्ध व्हा. (२) गुलामी मनोवृत्तीच्या जोखडातून मुक्त व्हा. (३) आपल्या विरासतीवर गर्व करा. ती चिरपुरातन नित्य नूतन आहे. (४) एक भारत श्रेष्ठ भारत करण्याची प्रतिज्ञा करा. त्यासाठी एकता व एकजुटता अंगी बाणवा. (५) नागरिकांचे कर्तव्य. हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे ध्यानी धरा. सर्व भारतीयांनी या पाच प्राणशक्तीचा उपयोग करावा अशी त्यांनी आग्रहाची विनंती केली. हे संकल्प ऐकताना मनोमन असे वाटले की हेच संकल्प घेऊन डॉक्टरजी स्वतः मार्गस्थ होत होते व मार्गदर्शन करत होते. विक्राळ प्रश्न व त्याची सोडवणूक यावरच डॉक्टरजी अखंड मंथन करत असत. आज मोदीजी डॉक्टरजींच्या रूपात बोलत होते. या दोघांची हालचाल पाहिली की मनात समर्थ रामदासांचा अभंग आठवतो.

भाग्यवंत नर यत्नासी तत्पर।
अखंड विचार चाळणेचा।
चाळणेचा यत्न यत्नाची चाळणा।
अखंड शहाणा तोचि एक ।।

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## पशु कल्याण शिबिराने प्रस्थापित केले गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

१९ फेब्रुवारी २०२५ – एसएमएफजी इंडिया क्रेडिटने सर्वात मोठे पशु कल्याण शिबिर (विविध ठिकाणे) यासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा मान मिळवत इतिहास रचला आहे. भारतातील ६ ठिकाणी ५१७ सहभागींसह हा विक्रम प्रस्थापित करण्यात आला. हा ऐतिहासिक टप्पा कंपनीच्या पशु विकास दिन(पीव्हीडी) देशभरातील सर्वात मोठे एकदिवसीय पशुकल्याण शिबीराच्या ७व्या सत्राचा भाग म्हणून गाठण्यात आला. भारतात सुमारे ६५-७०% ग्रामीण लोकसंख्या त्यांच्या जीवनमानासाठी शेती किंवा शेतीसंबंधित व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळे पशुधन त्यांच्या उपजीविकेच्या आणि आर्थिक समृद्धीच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावते. या अतूट नात्याची जाणीव ठेवून आणि ग्रामीण कुटुंबांच्या जीवनात पशुधनाचे महत्त्व दृढ करत एसएमएफजी इंडिया क्रेडिटने मेरा पशु मेरा परिवार या संकल्पनेखाली ७व्या पशु विकास दिनाचे आयोजन केले.ग्रामीण कल्याणासाठी असलेल्या कंपनीच्या बांधिलकीला बळकटी देत या वार्षिक पीव्हीडी कार्यक्रमात ६,००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला.

## वसंतोत्सवाच्या स्वागतासाठी पळस फुलला

सोयगाव,दि.२ मार्च- वसंतोत्सव,नूतनवर्षारंभाच्या स्वागतासाठी सर्वत्र पळस फुलला असून सोयगाव ते बनोटी ते फर्दापूर रोडच्या दोन्ही बाजूंना पळसाची फुले फुरले असून आनंददायी वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्याने दोन्ही बाजूला फुलांचे सडे पंडीत असून त्या फुलांचा सुगंध दरवळत आहे.उन्हाची तीव्रता असलीतरी पळसाचे फुलांची झूळक थंडावा करण्याचे कार्य करीत आहे. पळसाचे फुलांचा रंग नैसर्गिक असून आंघोळीच्या पाण्यात टाकून सर्वांनी आंघोळ केल्यास उण लागत नाही पळस पापडी (फळ) सुद्धा आरोग्याचे दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे जाणकार सांगतात.निसर्गाचा चमत्कार म्हणजे कडक उन्हाळ्यात पळासाला फुले येणे खरोखर निसर्गाचे मानवाच्या भल्यासाठी किती उपकारच म्हणावे लागते.संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे वृक्ष आम्हा सोयरे वनचरे.

## उत्कृष्ट कामगिरी बद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शरदचंद्र रोडगे यांचा सन्मान देऊन गौरव

तभा वृत्तसेवा बिडकीन दि २ मार्च पोलीस अधीक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, राज्यात सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यात विरगाव पोलीस ठाणे छत्रपती संभाजीनगर ग्रामीण तृतीय स्थानावर. तत्कालीन प्रभारी अधिकारी स पो नि.शरदचंद्र रोडगे यांचा माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार. दि १ मार्च रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या क्राईम कॉन्फरन्स मध्ये छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीसांना हा बहुमान मिळाला आहे.राज्यात कायदा व सुव्यवस्था गुन्हे प्रतिबंध दोषसिद्धी यामध्ये सुधारणा व्हावी, यासाठी विविध निकषाच्या आधारे सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांची निवड प्रक्रिया घेण्यात येते. राज्यपातळीवर



५ सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांची निवड करण्याचा निर्णय केंद्रीय स्तरावर घेण्यात आला होता.२०२२ मध्ये राज्यातील पाच पोलीस ठाण्यांची निवड करण्यासाठी समित्यांची निवड केली होती.राज्यातील सर्वोत्कृष्ट कार्य प्रणाली राबवणारे पोलीस ठाण्यांची निवड राज्यपातळीवर करण्याच्या उद्देशाने ह्या समित्याने दिलेल्या निकषाच्या आधारावर राज्यातील पोलीस ठाण्यातील कारभाराची पडताळणी केली होती.छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मधील विरगाव पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे यांनी २०२२मध्ये वीरगाव पोलीस ठाण्यांत गंभीर गुन्हे उघड, निर्गती, दोषसिद्धी, प्रशासन, आस्थापना, जनसंपर्क, इत्यादी निकषांमध्येउत्कृष्ट कार्य केले आहे..

त्यांच्या या उत्कृष्ट कार्यामुळे पोलीस ठाणे विरगाव हे राज्यात तिसऱ्या क्रमांकाचे सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे ठरविण्यात बाजी मारली आहे.सहायक पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते पारितोषिक देऊन पन्नास हजार रुपये बक्षीस देण्यात आले आहे. वर्ष २०२२ या वर्षासाठी तृतीय क्रमांकाचा उत्कृष्ट पोलीस ठाणे पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे. सध्या शरदचंद्र रोडगे पाचोड पोलीस ठाण्याचे प्रमुख आहे

## अनुसूचित जाती वर्गीकरणप्रश्री मातंग आरक्षण संघर्ष समितीची मुख्यमंत्र्यांशी सांगोपांग चर्चा

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

अनुसूचित जाती वर्गीकरणाचा मुद्दा अनेक दिवसापासून प्रलंबित आहे. याप्रश्नी राज्य सरकारने गांभीर्याने लक्ष घालावे तसेच अनुसूचित जातीचे 'अ' 'ब' 'क' 'ड' वर्गीकरण कायदा विधिमंडळात पारित करावा, अशी आग्रही मागणी करीत मातंग आरक्षण संघर्ष समितीच्या वतीने २८ फेब्रुवारी २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईतील सह्याद्री अतिगृह येथे भेट घेवून सविस्तर चर्चा करण्यात आली.

शेजारील तेलंगणा राज्याने अनुसूचित जातीचे 'अ', 'ब', 'क' असे उपवर्गीकरण करण्यात आले आहे. तसे महाराष्ट्र सरकारने सुद्धा उपवर्गिकरण कायदा विधिमंडळात पारित करून अनुसूचित जातीतील वंचित जातींना लवकर न्याय द्यावा, यासाठी वर्गीकरणाची मागणी आता महाराष्ट्रमध्ये जोर धरू लागली आहे. पंजाब, हरियाना, तामिळनाडू राज्यातील अनुसूचित जातीतील वंचित जातींना उपवर्गीकरणाप्रमाणे आरक्षणाचा लाभ मिळणे चालू झाले आहे. अनुसूचित जातींचे 'अ','ब','क', 'ड' उपवर्गीकरणाच्या मागणी तसेच लहुजी साळवे आयोगाच्या शिफारशी अंमलबजावणी करीता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री किशन रेड्डी यांची मुंबईतील सह्याद्री अतिथी ग्रह येथे मातंग आरक्षण संघर्ष समितीचे महाराष्ट्र प्रमुख अजित केसराळीकर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेऊन मागण्याचे सविस्तर निवेदन देण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर सकारात्मकता दर्शविली असल्याची माहिती अजित केसराळीकर यांनी दिली

या आहेत मागण्या

अनुसूचित जातीचे 'अ', 'ब', 'क', 'ड' उपवर्गीकरणाचा कायदा विधिमंडळात सहमत करण्यात यावा, क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशी अंमलबजावणीकरीता अयोगाचे पुनर्गठन करून आयोगास संविधानिक दर्जा व निधी देण्यात यावा, अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी असलेली सन- १९४९ अट पूर्ण करण्यास येत असलेल्या अडचणी बाबत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांच्या (७ न्यायाधीशांच्या घटनापीठाने) देविंदर सिंग विरुद्ध पंजाब सरकार सिव्हिल अपिल नं. २३१७/२०११ दि. १ ऑगस्ट २०२४ चा निकाल, सर्वोच्च न्यायालयाचा दि. २२ एप्रिल २०२० चा निकाल, सर्वोच्च न्यायालयाचा न्यायमूर्ती अरुण मिश्रा यांच्या (५ न्यायाधीशांच्या घटनापीठाने) देविंदर सिंग विरुद्ध पंजाब सरका सिव्हिल अपिल नं. २३१७/२०११,दि. २७ ऑगस्ट २०२० चा निकाल आदी मागण्या गांभीर्याने मान्य करण्याची आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## शास्त्रीय नृत्यकलावंत दिलीप खंडेराय यांना कलारत्न पुरस्कार प्रदान

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

सुजलेगाव येथील संत गाडगे महाराज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती, संत गाडगे महाराज जयंती आणि शाहीरमहर्षी आत्माराम पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कला महोत्सव घेण्यात आला. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या महोत्सवात ज्येष्ठ शास्त्रीय नृत्यकलावंत व 'कलामंडलम' चे संचालक दिलीप खंडेराय यांना त्यांच्या ४५ वर्षाच्या कला योगदानाबद्दल 'कलारत्न पुरस्कार' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ज्येष्ठ शाहीर दिगु तुमवाड यांच्या वतीने आयोजित समारंभात नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण, शिवराज पाटील होटाळकर, माधवराव पाटील शेळगावकर, रूपेश देशमुख यांच्या प्रमुख हस्ते खंडेराय यांना पुरस्कार बहाल करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील हजारो कलावंत उपस्थित होते.

## श्रीस्वामी समर्थ बालिकाश्रम येथे नूतनीकरण इमारतीचे हस्तांतरण; गरजू मुलांसाठी आवश्यक सोयीसुविधा

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

श्रीस्वामी समर्थ बालकाश्रम येथील नव्याने नूतनीकरण केलेल्या इमारतीचा उद्घाटन आणि हस्तांतरण सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. 'सीआयई इंडिया' च्या सीएसआर उपक्रमांतर्गत 'नवकिरण प्रकल्प' म्हणून 'सीवायडीए' संस्थेच्या माध्यमातून या नूतनीकरणाची संपूर्ण अंमलबजावणी करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश अनाथ व गरजू मुलांसाठी सुरक्षित आणि आरोग्यदायी निवास तसेच उत्तम शिक्षणाची सोय उपलब्ध करणे हा आहे.

या नूतनीकरणामध्ये विद्यार्थी निवासाच्या इमारतीचा पुनर्विकास, 'डब्ल्यूएएसएच' (पाणी, स्वच्छता आणि स्वच्छतागृह) सुविधा, स्वयंपाकघर व संलग्न शौचालयांचे नूतनीकरण, हात धुण्यासाठी व पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, ओपन जिम, तसेच सौर ऊर्जा यंत्रणा बसविण्यात आली. यासोबतच, मुलांसाठी दैनंदिन जीवनावश्यक वस्तू, अध्ययन साहित्य, वैद्यकीय सुविधा, गाद्या, बेड व अन्य आवश्यक साधने पुरविण्यात आली, जेणेकरून त्यांचा जीवनमानाचा दर्जा सुधारता येणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन दुग्धविकास व बहुजन कल्याण मंत्री अतुलजी सावे आणि सीआयईचे एचआर हेड विनायक कडस्कर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सीआयई इंडियाचे प्रशांत शर्मा, उद्योजक प्रशांत देशपांडे, सीवायडीएचे संस्थापक मॅथ्यू मट्टम सीवायडीएचे अमोल शेवाळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उपेंद्र कुलकर्णी, बालहक्क आयोगाचे अध्यक्ष प्रवीण घुगे, बाल कल्याण समितीच्या अध्यक्ष आशा शेरखाने कटके आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रेश्मा चिमन्द्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

उपस्थित मान्यवरांनी नवकिरण प्रकल्पाच्या सकारात्मक परिणामांवर प्रकाश टाकत हा उपक्रम मुलांसाठी सुरक्षित, आरोग्यदायी आणि प्रेरणादायी शिक्षणाचे वातावरण निर्माण करणारा असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये सीवायडीएचे विकास म्हस्के यांनी नेतृत्व केले, तर सीवायडीएचे प्रकल्प समन्वयक राम कोलगुडे यांनी सीवायडीए, सीआयई, संस्था आणि सर्व भागधारकांमध्ये समन्वय साधत कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विकास म्हस्के यांनी सर्व भागीदार, समर्थक आणि उपस्थितांचे आभार मानून नवकिरण प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी मिळालेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या सामूहिक प्रयत्नांमुळे बालकाश्रमातील मुलांसाठी अधिक चांगले भविष्य घडविण्याचे स्वप्न साकार झाले आहे. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी स्नेहभोजनाचा मनसोक्त आनंद लुटला.

## जाहीर प्रगटन

**विद्यमान श्रीमती व्ही. एन. काटकर मॅडम साहेब, दिवाणी न्यायाधीश क' स्तर साहेब कन्नड, यांचे न्यायालयात**

सी.एम.ए. १३२/२०२५ पुढील तारीख १५/०४/२०२५

अर्जदार : १) आशिष अरुण चपके, वयः ३८ वर्ष धंदाः नोकरी, रा N-53/SF-4/36/3 उत्तम नगर, सिडको कॉलनी नाशिक तालुका जिल्हा नाशिक. ह.मु देवगाव (रंगारी), तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), २) निखिल अरुण चपके, वयः ३५ वर्ष धंदाः नोकरी, रा N-53/SF-4/36/3 उत्तम नगर, सिडको कॉलनी नाशिक तालुका जिल्हा नाशिक. ह.मु देवगाव (रंगारी), तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ३) मीना अरुण चपके वयः ६३ वर्ष धंदाः घरकाम, रा N-53/SF-4/36/3 उत्तम नगर, सिडको कॉलनी नाशिक तालुका जिल्हा नाशिक, ह.मु देवगाव (रंगारी), तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ४) अश्विनी विनय चौहान, वयः ३९ वर्ष धंदाः घरकाम, रा विनय चौहान, ०४ श्री वल्लभपार्क, सेंट फ्रान्सिस स्कूल जवळ, चेतन नगर नाशिक, सिडको कॉलनी, नाशिक, तालुका जिल्हा नाशिक.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय : वारस हक्क प्रमाणपत्र (लीगल हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री संदीप ए शिरसे यांचेमार्फत या न्यायालयात अर्जदार ही वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदारांचे मयत वडील/ पती नामे कै. अरुण रतन चपके असून त्यांचा मृत्यू दिनांक ०४/१२/२०२४ रोजी सिडको, नाशिक तालुका जिल्हा नाशिक येथे मयत झालेल्या आहे मुनिसिपल कॉपोरेशन, सिडको, नाशिक तालुका जिल्हा नाशिक येथील मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे. सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक १ व २ हि मयत याची मुले असून, अर्जदार क्रमांक ३ मयत यांची पत्नी असून, अर्जदार क्रमांक ४ मयत यांची मुलगी आहे. सदरील अर्जदाराशिवाय मयत वडील / पती नामे कै. अरुण रतन चपके यांना इतर कोणीही वारस नाही तसेच रा देवगाव (रंगारी), तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे शैक्षणिक अथवा सरकारी कार्यालय (तलाठी/ग्रामपंचायत, तहसील इत्यादी.) यासाठी अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केले आहे. सबब अर्ज दाखल करण्यास कारण घडले

सबब या जाहीर प्रकटना द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कुणाचाही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत मा. न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप न आल्यास वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

दिनांक २५/०२/२०२५

आदेशावरून

क. लिपिक — सहायक अधीक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड

## टीव्हीवरील सर्वात मोठा होळी उत्सव - झी रिश्ते ॲवॉर्ड्स २०२५!

वर्षाची दीर्घप्रतिक्षित संध्या आता आली आहे. झी टीव्ही कुटुंब भव्य आणि आकर्षक झी रिश्ते ॲवॉर्ड्स २०२५ सह प्रेक्षकांना चकित करण्यासाठी सज्ज झाले आहे. हा भव्य उत्सव केवळ पुरस्कार संध्येपेक्षा कितीतरी अधिक आहे – हा झी टीव्ही कुटुंबातील कलाकार, निर्माते आणि निर्माणकर्ते यांच्यातील प्रेमळ नातेसंबंधांना आदरांजली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा निष्ठावंत प्रेक्षकांशी असलेले खोल नाते या खास बंधनाचा सन्मान करतो. होळीचा सण आता अगदी जवळ येऊन ठेपला असताना या वर्षीच्या झी रिश्ते ॲवॉर्ड्सची रंगांच्या या उत्सवाशी संबंधित एक संकल्पना आहे आणि जी पूर्वीपेक्षाही अधिक नेत्रदीपक मनोरंजनाचे आश्वासन देते! आणि कुटुंबांना एकत्र आणण्याचा प्रेम, एकता आणि मनोरंजनाच्या उत्साही उत्सवापेक्षा चांगला मार्ग कोणता असू शकतो? शिवाय, प्रेक्षक त्यांच्या आवडत्या झी टीव्ही पात्रे आणि त्यांच्या आवडत्या झी कुटुंबांना मंचावर अवतरलेले पाहून जबरदस्त परफॉर्मन्सेस, हलकेफुलके विनोद



आणि भावस्पर्शी नात्यासह एका अविस्मरणीय संध्येची अपेक्षा करू शकतात. झी रिश्ते ॲवॉर्ड्स २०२५, १५ मार्च रोजी संध्याकाळी ७:३० वाजता फक्त झी टीव्हीवर प्रसारित होतील.

रेड कार्पेटवर ग्लिट्झ आणि ग्लॅमरची सुरुवात झाली, जिथे झी कुटुंबच्या सिताऱ्यांनी त्यांच्या आकर्षक पोशाखात सर्वांचे लक्ष वेधून घेतले. डॅशिंग अर्जित तनेजा आणि सुंदर सृती झा यांनी सुंदर पांढऱ्या रंगातील पोशाखात सर्वांना मंत्रमुग्ध केले, तर अक्षय देव बिंद्राने आकर्षक लाल मखमली सूटमध्ये सर्वांचे मन जिंकले. ऐश्वर्या खरेनेही जांभळ्या रंगाच्या ड्रेसमध्ये आपली चमक दाखवली, तर टेलिव्हिजनवरील हार्टथ्रोब रोहित सुचांतिही जांभळ्या रंगाच्या सूटमध्ये खूपच आकर्षक दिसत होता. नेहमीच सुंदर दिसणाऱ्या राजश्री ठाकूरने चमकदार पिवळ्या साडीत, आकर्षकता आणि सौंदर्य दाखवले. तर आर्य बब्बरने पारंपारिक पंजाबी जुतीसह जोधपुरी सूटमध्ये राजेशाहीपणा दाखवला. आयुषी खुराणा आणि भरत अहलावत यांच्या स्टायलिश जोडीने हिरव्या भारतीय पोशाखात एक स्टाईल स्टेटमेंट केले.

या उत्साहात भर घालत सागर पारेख, रचना मिस्त्री आणि विजयेंद्र कुमेरिया या तिघांनी गुलाबी रंगाच्या आकर्षक छटांनी कार्पेट उजळून टाकले. नौशीन अली सरदारने क्लासिक काळ्या साडीत कालातीत सौंदर्य दाखवले, तर ज्येष्ठ अभिनेत्री जयती भाटिया पारंपारिक हिरव्या साडीत उठून दिसत होत्या. योगेंद्र विक्रम सिंग यांनीही नाजूक नक्षीदार इंडो-वेस्टर्न पोशाखात परंपरा आणि समकालीन शैलीचा सहज मिलाफ साधला. चाहत्यांची आवडती जोडी सिमरन कौर आणि अभिषेक मलिक यांनी सुंदर निळ्या पोशाखात रेड कार्पेटवर शाही भव्यता आणली. आणि संध्येच्या सर्वात स्टायलिश रुपात रवि दुबे आणि सार्गुन मेहता या सदाबहार जोडीने अनुक्रमे काळ्या रंगाच्या डॅपर सूट आणि चमकदार गुलाबी साडीत रेड कार्पेटवर सर्वांचे लक्ष वेधले. अनु मलिक यांनी सहजसुंदर राखाडी सूटमध्ये या संध्येला कालातीत भव्यतेचा स्पर्श दिला.

या संध्याकाळी रंगमंचावर काही अतिशय आकर्षक सादरीकरणे झाली ज्यांनी रंगमंचावर धूम माजवली! होळीच्या सणाला लक्षात ठेवून अनेक मंत्रमुग्ध करणाऱ्या कलाकृतींसोबत प्रेक्षकांच्या आवडत्या कलाकारांनी एक खास, भव्य होळी मेडली सादर केली ज्यामध्ये उत्सव आणि भव्यतेचे सार खरोखरच टिपले गेले. रीत आणि राघव यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या पावसातील नृत्यापासून ते ऋषी आणि लक्ष्मीच्या दिव्य राधा-कृष्णाच्या अभिनयापर्यंत ही संध्या मंत्रमुग्ध करणाऱ्या क्षणांनी भरलेली होती. झी टीव्हीच्या नायिकांनी शक्ती आणि कृपेचे दर्शन घडवणारा एक शक्तिशाली नवदुर्गा अभिनय सादर केला, तर एनर्जेटिक बॉय्ज विरुद्ध गर्ल्सच्या स्पर्धेने उत्साहाची रंगत आली. जागृती, सागर आणि आकाश यांच्या मनमोहक प्रेम त्रिकोणाच्या सादरीकरणाने संध्या अधिकच रंगली, ज्यामुळे भावना, कथाकथन आणि मनोरंजनाचे परिपूर्ण मिलाफ घडून आला.

आपल्या उत्कृष्ट पोशाखात ते भव्यता आणि शैलीचे प्रतीक बनले, ज्यामुळे झी रिश्ते ॲवॉर्ड्स २०२५ ची संध्या संस्मरणीय बनली.तुमच्या आवडत्या कलाकार आणि मालिकांपैकी कोणत्या कलाकारांना आणि मालिकांना प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले हे जाणून घेण्यासाठी आणि सर्व जबरदस्त परफॉर्मन्सेस पाहण्यासाठी पहा झी रिश्ते ॲवॉर्ड्स २०२५ १५ मार्च रोजी संध्याकाळी ७:३० वाजता फक्त झी टीव्हीवर!

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रोखठोक

दिनेश गुणे

# वेगळा दोहोपासूनि...

उद्यापासून सुरू होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाविकास आघाडीच्या झेंड्याखाली विधिमंडळात विरोधकांच्या बाकावर बसणाऱ्या पक्षांची नवी रणनीती काय असेल, हे येत्या काही तासांतील चहापानाच्या बैठकीस हजेरी लावण्याबाबत या पक्षांकडून स्वतंत्रपणे किंवा आघाडी म्हणून एकत्रितपणे घेतल्या जाणाऱ्या भूमिकेवरून स्पष्ट होईल. तोवर, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने स्थापन केलेल्या विरोधकांच्या शॅडो कॅबिनेटची चर्चा राजकारणात रंगलेली राहील. विरोधकांच्या एकत्रित संख्याबळानुसार विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद मिळविण्यासाठी करावी लागणारी वैधानिक कसरतदेखील सोपी नसल्याची जाणीव महाविकास आघाडीला असल्यामुळे सत्ताधारी महायुतीने सहकार्य केले तरच विरोधकांमधून विरोधी पक्षनेतेपदासाठी सुचविल्या जाणाऱ्या प्रस्तावाचे भवितव्य अवलंबून असले तरी तोवर शरद पवारांचा पक्ष थांबून राहणार नाही, हे त्यांच्या शॅडो कॅबिनेटमुळे आता स्पष्ट झाले आहे. महाविकास आघाडीने विरोधक म्हणून एकत्र काम करावे अशी या आघाडीतील तीन प्रमुख पक्षांची भूमिका असली, तरी त्याबाबत त्यांच्यामध्ये एकवाक्यतेचा अभाव असल्याचे याआधी अनेकदा स्पष्ट झाले आहे. विरोधी पक्षनेत्याच्या निवडीबाबतही अद्याप या आघाडीमध्ये एकमत झालेले नसल्याने, अधिवेशनकाळात किंवा यापुढे आघाडी म्हणून हे पक्ष किती काळ एकत्र राहतील हेही अजून पुरते स्पष्ट झालेले नाही. कदाचित यामुळेच, पवार यांच्या पक्षाने आघाडीच्या कुबड्यांवर पक्ष चालविण्याऐवजी स्वबळ वाढविण्याकरिता पक्षाची संघटनात्मक बांधणी करण्याचा स्वतंत्र निर्णय घेतला असावा. लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष सक्षम असावा या अपेक्षेला विधानसभा निवडणुकीच्या निकालातून महाराष्ट्रात फारसा प्रतिसाद मिळाला नाही. कदाचित त्यामुळेच, विरोधी पक्षनेतेपदाचा या तीन प्रमुख पक्षांतील वाद सामंजस्याने सुटण्याची चिन्हे दिसत नसावीत. हे पद आपल्याच पक्षाला मिळावे याकरिता उद्धव ठाकरे यांच्या गटाने विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहून साकडे घालण्याचा निर्णय घेतला असल्याच्या बातम्या गेल्या काही दिवसांत माध्यमांमध्ये रंगल्या होत्या. विरोधी पक्षांच्या आघाडीत आपल्या गटाच्या आमदारांची संख्या सर्वाधिक असल्यामुळे हे पद मिळावे अशी ठाकरे गटाची अपेक्षा आहे, असेही सांगण्यात येते. विधानसभा निवडणुकीत आघाडीतील कोणत्याही एका पक्षाकडे सभागृहाच्या सदस्यसंख्येपैकी किमान दहा टक्के सदस्य असतील तर त्या पक्षाकडे निर्विवादपणे हे पद जाते. महाविकास आघाडीतील कोणत्याही एका पक्षाने हा आकडा गाठलेला नसल्याने, आघाडीच्या एकत्रित संख्याबळाचा विचार करून विरोधी पक्षनेत्याच्या पदास मान्यता द्यावी यासाठी आघाडी म्हणून प्रयत्नशील असलेल्या तीन पक्षांतील मतभेदाचा पहिला टप्पा या पत्रामुळे पूर्ण झाला आहे. साहजिकच, फडणवीस सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सभागृहात विरोधी पक्षनेतेपदावर कोण बसणार हे अद्याप संदिग्धच आहे.

विरोधी पक्षनेत्यास कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा असल्याने विरोधकांतील हे पद महत्त्वाचे ठरते. महाराष्ट्राच्या विधिमंडळास सुमारे दीडशे वर्षांहून अधिक काळाची प्रदीर्घ परंपरा आहे. या विधिमंडळास वैभवशाली इतिहास आहे. १८६१ साली तत्कालीन इंडियन कौन्सिल कायद्यानुसार सुरू झालेल्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून विधिमंडळे अस्तित्वात आली व २२ जानेवारी १८६२ रोजी तत्कालीन विधिमंडळाची पहिली बैठक मुंबईत झाली. तेव्हापासूनच्या इतिहासात असा पेच बहुधा क्वचितच निर्माण झाला असावा. अर्थात, संख्याबळ नसतानाही, १९८६ ते १९९० या काळात जनता पक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाकडे विरोधी पक्षनेतेपद सोपविण्यात आले होते. म्हणजे, सत्ताधारी पक्ष याबाबत किती लवचीक आहे, त्यावरच अशा परिस्थितीतील विरोधी पक्षनेतेपदाचे भवितव्य ठरलेले असते. लोकसभेतही याआधीच्या दोन लोकसभा निवडणुकांनंतर विरोधी पक्षांना याच परिस्थितीचा अनुभव घ्यावा लागला होता. तेथेही कोणत्याच एका पक्षाला सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येपैकी किमान दहा टक्के किंवा ५५ जागांवर विजय मिळाला नसल्याने २०१४ व २०१९ मध्ये विरोधकांचे कामकाज विरोधी पक्षनेत्याविनाच चालविले गेले. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या अगोदर ज्या तीन पक्षांमध्ये मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवाराचे नाव निश्चित करण्यावरून विसंवाद शिगेला पोहोचला होता, त्या पक्षांमध्ये आता विरोधी पक्षनेता निवडण्यासाठी आवश्यक असलेल्या संख्याबळाअभावी परस्परांत नवा वाद घालण्याची वेळ यावी ही या काळातील राजकीय शोकांतिका या आघाडीस अनुभवावी लागत आहे. लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला राज्यात अनपेक्षितपणे मिळालेल्या मोठ्या यशामुळे विधानसभेच्या निवडणुकीआधी याच आघाडीचे नेते महाविजयाच्या विश्वासाने वावरत होते. तो विश्वास एवढा प्रचंड होता की, महाविकास आघाडी सत्तेवरच येणार असल्याने, महायुतीने विरोधी पक्षनेता निवडून ठेवावा, असा सल्लाच तेव्हा काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने दिला होता. आता त्याच महाविकास आघाडीत विरोधी पक्षनेतेपदाच्या वादावरून रस्सीखेच सुरू असून सत्ताधारी पक्षाच्या भूमिकेवर या पदाचे भवितव्य असणार हे स्पष्ट झाले आहे. हे पद महाविकास आघाडीला मिळाले तरी तीनही पक्षांच्या एकत्रित संख्याबळातही शरद पवार यांच्या गटाकडे या पदावर दूरान्वयानेही दावा करण्याएवढे संख्याबळ नसल्याने या वादापासून अलिप्त राहण्याची वेळ शरद पवार यांच्यावर आली आहे. सत्तेच्या राजकारणापासून एवढे दूर राहण्याची वेळ शरद पवार यांच्यावर बहुधा पहिल्यांदाच ओढवली असावी. कदाचित त्यामुळेच, प्रत्यक्ष सत्ता नसली तरी सत्तेचे आभासी वातावरण निर्माण करून पक्षाच्या नेते-कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रति मंत्रिमंडळ, म्हणजे शॅडो कॅबिनेट स्थापन करण्याचा निर्णय नाईलाजाने पवार यांना घ्यावा लागला असावा. त्यातही, या प्रति मंत्रिमंडळात कोणत्या नेत्यास स्थान मिळाले, कोणास कोणत्या खात्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी मिळाली आणि कोणत्या नेत्यास शॅडो कॅबिनेटमधूनही डावलले गेले, याची चर्चा आता रंगली असून, त्यामुळे पवार यांच्या गटातील कोणत्या नेत्याचे राजकीय वजन किती याचे मोजमापही सुरू झाले आहे. सातत्याने सत्तेच्या राजकारणात राहिलेल्यांना फार काळ सत्तेपासून दूर राहता येत नाही. तसे होत राहिल्यास त्यांची राजकीय घुसमट होते आणि अशी घुसमट सातत्याने सुरू राहिल्यास असे नेते आपल्या राजकीय भवितव्याचा मार्ग स्वतःच शोधू लागतात, हा राजकारणातील इतिहास आहे. पवार यांच्या गटास कदाचित याच भयाने ग्रासले असावे. त्यामुळे, विरोधी पक्षनेतेपद नाही, तर किमानपक्षी प्रति मंत्रिमंडळातील मंत्रिपदे किंवा जबाबदाऱ्या शिरावर घेऊन नेत्यांना कामाला लावण्याची भूमिका त्यांनी घेतली असावी. अर्थात, हे एका दृष्टीने चांगलेच झाले. ठाकरे गटामध्ये सध्या कमालीचा संभ्रम पसरलेला दिसतो. आज पक्षासोबत असलेला कार्यकर्ता किंवा नेता पुढच्या क्षणाला पक्षासोबत राहीलच, याची कोणतीही खात्री खुद्द उद्धव ठाकरे यांनादेखील राहिलेली नाही. तसे त्यांच्या वक्तव्यांतून वारंवार ध्वनितदेखील झाले आहे. त्यामुळे, विरोधी पक्षनेतेपद मिळालेच, तर गटामध्ये शिल्लक असलेल्या राजकीय धुगधुगीवर नव्याने फुंकर तरी मारता येईल, अशी त्या गटाची स्थिती आहे. एकीकडे ठाकरे गटात असा संभ्रम असला, तरी ठाकरे यांच्या शिवसेनेच्या मुखपत्रात मात्र, पवार यांच्या या कृतीची भरभरून स्तुती करण्यात आली आहे. शरद पवार ॲक्शन मोडमध्ये आले असून सरकारच्या कामावर अंकुश ठेवण्यासाठी त्यांच्या गटाचे प्रति मंत्रिमंडळ कामाला लागेल, याचा आनंद या मुखपत्रातून उमटतो आहे. पवार यांच्या गटाचे हे प्रति मंत्रिमंडळ पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढेल, राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर या प्रति मंत्रिमंडळाची नजर असेल आणि पक्षसंघटनेत नव्या चेहऱ्यांना जागा मिळेल, असा धोरणात्मक निर्णय पवार यांच्या गटाने घेतला आहे. विरोधी पक्षनेतेपदाबाबत विरोधकांच्या आघाडीत जो काही निर्णय घेतला जाईल, त्यानुसार सादर होणाऱ्या प्रस्तावाचा



सरकारने विचार करावा असा एक ठरावही पवार यांच्या गटाने अधिवेशनापूर्वीच्या पक्षांतर्गत बैठकीत घेतल्याचे सांगण्यात येते. पदावर दावा करण्यासारखी स्थिती महाविकास आघाडीकडे नाही, हे मान्य करून पवार यांनी घेतलेल्या या भूमिकेवरून, विरोधकांच्या मानसिकतेचे बोलके संकेत स्पष्ट झाले आहेत.

विरोधकांच्या तंबूतील या परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर उद्यापासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनावर सत्ताधारी महायुतीची संपूर्ण पकड राहील हे उघड आहे. येत्या १० तारखेला राज्याचा अर्थसंकल्प सादर होईल. याआधी गेल्या वर्षी, जून २०२४ मध्ये अर्थमंत्री या नात्याने अजित पवार यांनीच सादर केलेल्या अर्थरिक्त अर्थसंकल्पाची आणि त्याआधी फेब्रुवारी २०२४ मध्ये सादर केलेल्या अंतरिम अर्थसंकल्पाची सावली नव्या अर्थसंकल्पावर असेल. राज्यातील महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीआधी जाहीर केलेल्या लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीमुळे राज्याच्या तिजोरीवर पडलेला आर्थिक भार, या योजनेत घुसखोरी केलेल्या अपात्र लाभार्थींना मिळालेली मदत आणि वंचित राहिलेल्या पात्र महिलांचा आढावा हा मुद्दा आता अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने सरकारला हाती घ्यावा लागणार आहे. राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर्सच्या टप्प्यावर नेऊन ठेवणे, महिला, शेतकरी, युवा, मागासवर्ग आणि समाजातील सर्व गरिबांना भरीव आर्थिक मदत देऊन प्रगतीच्या सर्व संधी उपलब्ध करून देण्याचा राज्य सरकारचा संकल्प त्या वेळी अजित पवार यांनी जाहीर केला होता. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची कार्यवाही सातत्याने सुरू राहावी यासाठी दर वर्षी ४६ हजार कोटी रुपये राखून ठेवण्याची ग्वाहीदेखील त्यांनी अतिरिक्त अर्थसंकल्पात दिली होती. दरम्यानच्या काळात, या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडत असून अन्य काही योजनांच्या अंमलबजावणीत अडचणी येत असल्याचे नोकरशाहीकडून सूचित होऊ लागले असल्याने, यंदाच्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी सरकारकडून कशी तरतूद करण्यात येणार, या योजनेची नवी अंमलबजावणी कशी असेल याकडे राज्याचे लक्ष असणार आहे. सत्ताधारी युतीला विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या महाविजयात या योजनेचा वाटा मोठा असल्याचे वास्तव विरोधी पक्षांनीही मान्य केले आहे. महाविकास आघाडी सत्तेवर आल्यास ही योजना रद्द करण्याचे संकेत देणाऱ्या महाविकास आघाडीने त्याही पुढे जाऊन महालक्ष्मी योजना आणण्याची घोषणा केली होती. अशा योजना रद्द करणे राजकीयदृष्ट्या तोट्याचे ठरते हे स्पष्ट असल्याने, महायुती सरकारला आता ही योजना घासूनपुसून नव्या रूपात आखावी लागणार आहे. त्यासाठी अर्थसंकल्पाचा मुहूर्त कसा साधला जातो आणि विरोधक त्याकडे कसे पाहतात, याचाही कस लागणार आहे. महिलांच्या स्वयंरोजगारासाठी राज्याच्या १७ शहरांतील १० हजार महिलांना पिंक ई-रिक्षा योजनेतून अर्थसाह्य करण्यासाठी अर्थमंत्र्यांनी ८० हजार कोटींची तरतूद प्रस्तावित केली होती. या योजनेच्या सद्यःस्थितीचा आढावादेखील यंदाच्या अर्थसंकल्पात पाहावयास मिळणार आहे. स्टार्टअप योजनेतून उद्योगक्षेत्रात नवी भरारी घेणाऱ्या महिलांचे राष्ट्रीय स्तरावरील अधिवेशन महाराष्ट्रात भरविण्याच्या अजित पवार यांच्या संकल्पाचा पाठपुरावाही या निमित्ताने होणार आहे. राज्यातील अपूर्ण राहिलेले सिंचन प्रकल्प वेगाने पूर्ण करण्याकरिता महायुती सरकारने उचललेली पावले गेल्या सहा महिन्यांत किती पुढे सरकली, याचा तपशीलही या अधिवेशनात स्पष्ट होईल. आणखी सुमारे दीड वर्षांत राज्यातील असे ६१ सिंचन प्रकल्प पूर्ण होऊन ३.६५ लाख हेक्टर अतिरिक्त सिंचनक्षमता निर्माण होईल, असा दावा पवार यांनी केल्यानंतर विरोधकांसह सर्वांनीच त्याचे बाके वाजवून स्वागत केले होते. उपसा सिचन योजनांसाठी सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर करता यावा याकरिता सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ येथ प्रस्तावित असलेल्या पथदर्शी प्रकल्पाचे काम कुठपर्यंत आले, सुमारे ४२०० कोटी रुपये खर्च प्रस्तावित असलेल्या उपसा सिंचन योजना सौर ऊर्जीकरण मोहिमेतून किती सिंचन योजनांना फायदा झाला, दुष्काळग्रस्त भागांत पाणी वळविण्याची तीन हजार कोटींची प्रस्तावित योजना कोणत्या टप्प्यावर आहे, अशा काही, महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी शरद पवार गटाच्या प्रति मंत्रिमंडळास कंबर कसून काम करावे लागणार आहे.

राज्यातील सर्व समुदायांतील सर्व घटकांच्या विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. तशी ग्वाही सरकारने सातत्याने दिली आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या योजना परिणामकारकपणे, पारदर्शीपणाने व प्रामाणिकपणे राबविणे, नवीन विशेष योजना आखणे व त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करणे हे महायुती सरकारचे धोरण आहे. सर्व स्वरूपातील सार्वत्रिक दारिद्र्य दूर करून शाश्वत सामाजिक विकास साधणे हे सरकारचे ध्येय आहे, अशी ग्वाही राज्यातील महायुती सरकारने विधिमंडळात दिली आहे. सभागृहात सरकारवर अंकुश ठेवण्याची व जनहिताच्या कामासाठी सरकारला प्रसंगी धारेवर धरण्याची जबाबदारी विरोधी पक्षांवर असते. विरोधी पक्षनेतेपदाचा वाद असो, किंवा महाविकास आघाडीच्या भवितव्याचा प्रश्न असो, त्यातून वेळ काढून राज्यहिताच्या मुद्यावर विरोधकांना भूमिका घ्यावीच लागते. महायुती सरकारच्या संकल्पांतून राज्याचे हित साधण्याची आणि पारदर्शक कारभाराची हमी दिसत असल्याने, विरोधी पक्षांकडून या संकल्पपूर्तीसाठी कसे सहकार्य मिळणार हे या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काळात स्पष्ट होणार आहे. कारण, जनतेच्या सरकारकडून अपेक्षा असतातच, पण विरोधी पक्षांकडूनही अपेक्षा असतात. केवळ राजकारणापायी या अपेक्षांकडे दुर्लक्ष होऊ नये, याची खबरदारी विरोधकांनी घेतली पाहिजे. पवार यांच्या गटाने स्थापन केलेल्या प्रति मंत्रिमंडळावर हीदेखील एक मोठी जबाबदारी राहणार आहे. 'निंदी कोणी मारी, वंदी कोणी पूजा करी, मज हेही नाही, तेही नाही, वेगळा दोहोपासूनि' या त्रयस्थभावाने गेल्या वर्षी अजित पवार यांनी आपला अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला होता. आता त्यांच्या अकराव्या अर्थसंकल्पात असा अलिप्तपणा राहणार नाही, अशी अपेक्षा आहे. ■

dineshgune @gmail.com

## रविवारची पत्रे

### जगा आणि जगू द्या

आयुष्य मुळातच एक खडतर वाटचाल, खरं तर बरेच खाचखळगे असणारं म्हणूनच इथे नेहमीच 'भले बुरे ते घडून गेले विसरून जाऊ सारे क्षणभर' असं म्हणत पुढे चालावं लागतं, मागे जाणारा प्रत्येक क्षण हा भूतकाळात जमा होतो. असे सुखद क्षण जपावे आणि दुःखद क्षणांना तिलांजली देऊन दैवाने मिळणारे जीवन आणि कर्माने मिळणारी संगत ठेवा म्हणून जपावी. परमेश्वराकडून मिळालेलं आयुष्याचं वरदान आहे, हे आहे त्यापेक्षा अजून सुंदर करावं की जबरदस्ती म्हणून स्वीकारावं हे आपल्याला ठरवायचं असतं. मुळात जन्म ते मृत्यू या प्रवासात आपण एकटेच जीवन जगत नसतो, आपल्या सोबत अनेक सहप्रवासी असतात. म्हणूनच आपल्या जीवन जगण्याच्या पद्धतीचा इतरांना त्रास होऊ नये अशी आपल्या जगण्याची पद्धत असावी. आयुष्य हे खरंच क्षणभंगुर आहे आणि म्हणून ते अनमोल आहे कारण याचा अंत माहीत नसतो आणि आलेला अंत थांबवण्याचे तंत्र अजून तरी माणसाला अवगत झालेले नाही. म्हणून समोर येणारा प्रत्येक क्षण आनंदाने जगा. प्रत्येक सूर्योदयाला मिळालेल्या त्या सुंदर क्षणासाठी विधात्याचे आभार माना आणि रोज सकाळी सुंदर हास्याने स्वतःचेच स्वागत करा आणि बघा काय बद्दल होतो, मुळात स्वतःची जीवनशैली अशी असू द्या की त्याचा कोणाला त्रास होणार नाही. इतकं अलगद आपलं आयुष्य असावं की आपल्या असण्याच्या जाणिवेने सुद्धा लोक सुखावले पाहिजे. कुरकुर, कलह आणि नाराजीने वाद वाढतो, नातं टिकत नाही, उगाचंच दुसऱ्याचे दोष काढण्यापेक्षा दुसऱ्याचा माणूस म्हणून स्वीकार करा मग त्याचे सगळे दोष तुम्हाला क्षुल्लक वाटायला लागतील. आपणही कधी कधी चुकतोच. त्याचा मोठ्या मनाने स्वीकार करा. कधी कधी अहंकार इतका मोठा होतो की माणसं दुरावतात म्हणूनच अहंकार प्रेमापेक्षा मोठा होऊ देऊ नका. स्वाभिमान असावा पण आत्माभिमान नसावा. कारण नातं महत्त्वाचं असतंच. मनुष्य एकटा राहू शकत नाही, त्याला सोबत ही लागतेच, म्हणून माणसं टिकवायला हवी. तोडण्यापेक्षा जोडणं कठीण असतं. म्हणून आपल्या वागणुकीने ती टिकवून ठेवावी. एकदा मनाने दुखावलेला माणूस परत येत नाही. कधी कधी काही माणसे आपोआपच दिसेनाशी होतात म्हणजे बोलणं टाळतात. आपल्याला कळतंच नाही नेमकं काय झालं, कुठे चुकलं. आपण उत्तर शोधायचा प्रयत्न करतो, पण ती दुरावलेली असतात. अशा माणसांना परत आणणे कठीण होतं. म्हणूनच झाली असेल कधी चूक तर माफ करावं, सोडून द्यावं त्यामुळे नातं टिकतं, दुरावा संपतो. आपली जीवनशैली अत्यंत साधी सरळ असावी म्हणजे आपला कोणाला त्रास होऊ नये. कधी कधी आपली इच्छा नसतानाही इतरांना आपला त्रास होतो, हरकत नाही. तेव्हा आपला इलाज नसतो, त्यासाठी क्षमा मागण्याइतकी नम्रता तुमच्या ठायी असू द्या. पण मुद्दाम कोणाला त्रास देण्याची वृत्ती नसावी, दुसऱ्याला मान द्या. तुम्हालाही मान मिळेल आणि मिळालेलं जीवन तुमच्यासाठी वरदान ठरेलं. म्हणूनच म्हणते जगा आणि इतरांनाही जगू द्या.

**अंजली देशपांडे**/ ९४२२१५९९९२

### पाल्यांना योग्य संस्कारांची गरज

आजच्या काळात अधिक तीव्रपणे हे जाणवते की बदललेल्या जीवनशैलीत, तंत्रज्ञानाच्या प्रभावाखाली आणि सामाजिक परिवर्तनांच्या प्रभावामुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर लहानपणापासूनच विविध घटकांचा परिणाम होतो. या प्रक्रियेत संस्कारांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. संस्कार म्हणजे केवळ शिस्त लावणं, नियम सांगणं किंवा काय करावं किंवा काय करू नये याचे धडे देणं इतकं मर्यादित नाही. संस्कार हे मुलांच्या संपूर्ण मानसिक, शारीरिक, भावनिक आणि नैतिक विकासासाठी आवश्यक असतात. संस्कार ही मूल्याधारित प्रक्रिया आहे, ज्यातून मुलांना जीवनाचे खरे अर्थ समजतात. सध्याच्या धावत्या जगात पालकत्वाची जबाबदारी आणखी गुंतागुंतीची झाली आहे. जिथे जीवन अधिक स्पर्धात्मक आणि यांत्रिकी झालं आहे, तिथे मुलांच्या मानसिकतेवर याचा दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. टीव्ही, मोबाईल, इंटरनेट यासारख्या माध्यमांनी मुलांच्या विचारसरणीवर त्यावरूनच ते शिकतात आणि अनेकदा त्यांच्यातील नैतिक आणि सामाजिक मूल्यांना बाधा येते. म्हणूनच, पालकांची भूमिका मुलांना योग्य मार्गदर्शन देणारी असली पाहिजे. संस्कारांचे बीज लहान वयातच मुलांच्या मनात पेरले गेल्यास, त्याचे परिणाम त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर सकारात्मक असतात. संस्कारांची खरी सुरुवात घरातून होते. घरातील वातावरण, पालकांचं वर्तन, त्यांचं बोलणं आणि एकूणच जीवनशैली यावर मुलं आपली विचारसरणी आणि वर्तन निर्माण करतात. घरात आदर, सहिष्णुता, आणि प्रेमाचं वातावरण असेल, तर मुलं देखील या गुणांचा अंगीकार करतात. आजच्या आधुनिक काळात अनेक पालक व्यस्त जीवनशैलीमुळे मुलांकडे पुरेसं लक्ष देऊ शकत नाहीत. त्यातून मुलांमध्ये असंवेदनशीलता आणि समाजविरोधी वृत्ती निर्माण होऊ शकते. त्यामुळे मुलांना योग्य मार्गदर्शन देणं आणि त्यांना जीवनाच्या महत्त्वाच्या गोष्टी शिकवणं हे पालकांचं प्रथम कर्तव्य आहे. शाळा ही मुलांसाठी दुसरं शिक्षण केंद्र असतं, जिथे मुलं विविध प्रकारच्या ज्ञानासोबतच नैतिकता, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी शिकतात. शिक्षणव्यवस्था संस्कारांचा एक महत्त्वाचा भाग आहे. शाळेतील शिक्षक हे मुलांच्या मानसिकतेवर मोठा प्रभाव टाकतात. शिक्षकांनी फक्त अभ्यासच शिकवू नये, तर मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी प्रयत्न करावा. त्यांना शिकवताना शिस्त, नीतिमत्ता आणि मानवतेच्या मूल्यांचं महत्त्व सांगणं अत्यावश्यक आहे. परंतु आजच्या शिक्षणव्यवस्थेत शालेय अभ्यासक्रमाकडेच अधिक लक्ष दिलं जातं, त्यामुळे मुलांना योग्य मूल्यसंस्कार देण्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. शिक्षकांनी त्यांच्या शिकवण्यामध्ये मूल्य शिक्षणाचा अंतर्भाव करावा, जेणेकरून मुलं फक्त शालेय ज्ञानाचं अनुकरण न करता जीवनातील इतर आवश्यक गुण आत्मसात करतील. संस्कार मुलांना जीवनात आलेल्या आव्हानांना सामोरं जाण्याची क्षमता प्रदान करतात. जीवनात अनेक अडचणी येतात आणि त्यातून वाट काढण्यासाठी मानसिक आणि नैतिक धैर्य आवश्यक असतं. हे धैर्य मुलांना त्यांच्यावर केलेल्या संस्कारांमधून मिळतं. जीवनात संयम, सहिष्णुता आणि सकारात्मक दृष्टिकोन यासारखे गुण जर मुलं शिकले, तर ते कोणत्याही परिस्थितीत आपल्या ध्येयापासून विचलित होणार नाहीत. संस्कार मुलांना आत्मनिर्भर बनवतात, ज्यामुळे ते आयुष्यातील निर्णय योग्यरित्या घेऊ शकतात. तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे मुलं लवकरच मोबाईल, इंटरनेट, आणि इतर डिजिटल माध्यमांकडे वळत आहेत. यामुळे त्यांचं व्यक्तिमत्त्व विकासात अडथळा येण्याची शक्यता आहे. मुलांना योग्य वेळेवर योग्य गोष्टींचा वापर करण्याचं भान संस्कारांमधूनच येतं. उदाहरणार्थ, मोबाईलचा योग्य वापर कसा करावा, त्यातून अभ्यासात किंवा इतर क्रियाकलापांमध्ये कसा उपयोग करावा, हे मुलांना शिकवणं आवश्यक आहे. तंत्रज्ञानाच्या अनियंत्रित वापरामुळे मुलांच्या नैतिकतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो, आणि ते आळशी, आत्मकेंद्री आणि असंवेदनशील होण्याची शक्यता असते. त्यामुळे पालकांनी तंत्रज्ञानाच्या वापरावर नियंत्रण ठेवत मुलांमध्ये शिस्त आणि जबाबदारीची भावना निर्माण करायला हवी. पालकांसाठी मुलांना योग्य संस्कार देणं हे एक मोठं आव्हान असू शकतं, कारण त्यात वेळ, संयम, आणि समर्पण आवश्यक आहे. मुलांना काय योग्य आणि काय अयोग्य हे समजून देणं, त्यांच्या भावनांचा आदर करणं, आणि त्यांना योग्य वेळेवर योग्य शिकवण देणं हे पालकांच्या जबाबदाऱ्या आहेत. मुलं प्रत्येक गोष्ट शिकण्यासाठी उत्सुक असतात, त्यामुळे त्यांना जीवनातील महत्त्वाच्या गोष्टी सांगायला कधीच उशीर करू नये. संस्कारांमुळे मुलं योग्य मार्गावर चालत राहतील, आणि त्यांना भविष्यातील आव्हानांशी लढण्याची क्षमता प्राप्त होईल. समाजातही मुलांवर संस्कारांचा प्रभाव पडतो. समाजातील चांगले आणि वाईट, दोन्ही घटक त्यांच्या वर्तनावर परिणाम करतात. त्यामुळे मुलांना योग्य आणि अनुकरणीय आदर्श दाखवणं महत्त्वाचं आहे. त्यांनी चांगल्या लोकांकडून चांगल्या गोष्टी शिकाव्यात. त्यांना समाजातील जबाबदाऱ्या कळल्या पाहिजेत, आणि इतरांच्या भल्यासाठी काम करणं याचं महत्त्व पटवून दिलं पाहिजे. जर मुलांवर समाजातल्या नकारात्मक गोष्टींचा प्रभाव पडत असेल, तर पालक आणि शिक्षकांनी तातडीने लक्ष घालून त्यांना योग्य मार्गदर्शन करायला हवं. शेवटी, मुलं म्हणजे पालकांचं प्रतिबिंब असतात. जसं पालकांचं वर्तन असतं, तसं मुलांचं देखील असतं. त्यामुळे पालकांनी स्वतःच्या वर्तनातून मुलांना योग्य शिकवण द्यायला हवी. त्यांनी मुलांसमोर योग्य आदर्श ठेवावा, होणार आहेत, आणि त्यांच्यावर केलेले संस्कार त्यांना योग्य मार्ग दाखवतील.

**सचिन चव्हाण** / ९१५८३९३२६०

### आम्ही अनुभवलेला महाकुंभ

मकरसंक्रांतीपासून महाकुंभाची सुरुवात झाली तेव्हापासून तिथे भेट देण्याची इच्छा होती. पण कोणत्या ना कोणत्या कारणाने योग येत होते आणि निसटत होते, शेवटी १७ फेब्रुवारीला नातेवाईक व मित्रांसोबत योग जुळून आला. सकाळी साडेनऊ वाजता आम्ही नागपूरहून चारचाकीने निघालो. आमच्या सोबतच खूप वाहने कुंभासाठी जाताना दिसली. जाणे व येणे दोन्हीकडील रस्ता कुंभमय होता, तरी मैहरपर्यंत



चांगल्या वेगाने पोहोचलो. नंतर मात्र मधूनमधून छोटा जाम लागत होता. मध्यप्रदेशची सीमा संपल्यावर उत्तरप्रदेश प्रदेशमध्ये प्रवेश केल्यानंतर प्रयागराजसाठी तीस किलोमीटर अंतरापासून जाम सुरू झाला. रात्रीचे साडेआठ वाजले होते, मुंगीच्या गतीने आमचा प्रवास सुरू होता. कुंभ यात्रेकरूंसाठी रस्ता बाहेरून वळविण्यात आला आहे, मध्ये एक रेल्वे क्रॉसिंग होते. रेल्वेचा पण भरपूर ट्रॅफिक व वाहनांच्या गर्दीत हायवेला पोहोचून कुंभ वाहनांसाठी तयार केलेल्या विस्तारित पार्किंगपर्यंत पोहोचायला पहाटेचे चार वाजले. तिथे सुद्धा यात्रेकरूंसाठी स्वच्छतागृहांची मुबलक व्यवस्था केलेली होती. पुढील रस्ता पोलिसांनी अडवला होता, आम्ही व्हीआयपी लोकांची ओळख पटवून गावात प्रवेश मिळवला. तिथून कुंभ सिटीच्या पार्किंगपर्यंत पोहोचायला पाच वाजले. तिथून दीड किलोमीटर अंतरावरील वनवासी कल्याण आश्रमच्या बिरसा मुंडा स्थळी पोहोचून आराम केला. सकाळी तयार होऊन तिथच्याच कॅम्पमध्ये चहा, नाश्ता उरकून कुंभ सिटीत फेरफटका मारला. मोठमोठ्या सनातनी संस्थांचे व आखाड्यांच्या कॅम्पचे दुरूनच दर्शन घेतले. व्यवस्थापनाने कुंभ सिटीच्या जवळ दोन/तीन किलोमीटर वर अरैल घाटावर संगम स्नानासाठी विस्तृत व्यवस्था केली होती. तसेच विविध सेक्टरचे जवळपास पण बऱ्याच ठिकाणी संगमाजवळच्या गंगा स्नानासाठी चांगली व्यवस्था होती. आम्ही यमुना नदीवरील बोट क्लबवरून नावेने त्रिवेणी संगमावर कुंभ स्नान घेतलं. त्रिवेणी संगमावर हजारो लोक सुरक्षितपणे स्नान करू शकतील अशी व्यवस्था प्रशासनाने केली होती. स्नान करताना काही नियमित प्रकारचे मंत्रोच्चार करू असे ठरवून गेलो होतो पण एक डुबकी घेताच ठरवलेल्या गोष्टी व सर्व जाणिवा विसरून एका अद्‌भुत चैतन्य स्थितीत पोहोचल्यासारखे वाटले. जवळपास सर्वच भाविकांची स्थिती सारखीच असावी असे वाटले. घरून निघताना पुण्य वगैरे मिळेल ही भावना पाऊणशे टक्के तरी लोकांची नसावी, फक्त अशा ठिकाणी जाऊन तेथील देखावा/नजारा डोळ्याखालून घालावा याच भावनेने बरीच मंडळी तिथे पोहोचली असणार. संगमामध्ये एक डुबकी घेताच जी वेगळी ऊर्जा जाणवते, अशा लाखो लोकांच्या ऊर्जा आस्थेचं तिथे एकत्रीकरण होतं याची अनुभूती अवर्णनीय आहे. ती तिथे जाऊनच अनुभवू शकतो. ज्या अनुभूतीचा आनंद मिळावा यासाठी कर्मयोगी, ज्ञानयोगी व भक्तियोगी वर्षोनुवर्षे साधना करतात ती अनुभूती कुंभ स्नानाच्या एका डुबकीने प्राप्त केल्याचं समाधान यात्रेकरूंना होऊन त्यांचं भाविकांमध्ये परिवर्तन होतं आणि लाखो भाविकांच्या आस्थांचे एकीकरण होऊन त्यातून आध्यात्मिक ऊर्जेचा महाकुंभ तयार होऊन भक्तांवर अमृताचा वर्षाव करतो हीच कुंभपर्वाची खरी गोम ही विशिष्ट नक्षत्र राशी यांच्या संयोगकाळी तिथे जाऊनच अनुभवता येते. आणि म्हणूनच हजारो वर्षांपासून ही परंपरा अव्याहतपणे सुरू आहे व सुरू राहणार आहे. कुंभपर्व हे सर्व मानवी जीवांसाठी मुक्त स्थान आहे, तिथे म्हणूनच विदेशी साधक, अठरा पगड जातीचे लोक, विविध पंथांचे लोक मुक्तपणे येथील आस्था ऊर्जेच्या अमृत वर्षावाचा आनंद उपभोगू शकतात. देशभरातून येणाऱ्या लाखो लोकांसाठी इंधन उपलब्धता केल्यामुळे तसेच प्रयागराजला येण्यासाठी चांगले रस्ते उपलब्ध करून देणे ही जबाबदारी मोदी, गडकरी, योगी यांनी उत्तम रीतीने पार पाडल्यामुळे महाकुंभ पर्व भाविकांसाठी सुसह्य ठरला.

**श्रीराम डोळस**/ ९९२२२३३८९९

### मराठी भाषेपुढील 'अभिजात' अडथळे

'अभिजात' हा शब्द सध्या फारच वेगाने चलनात आला असून ज्याच्या त्याच्या तोंडी तो सहज उच्चारला जातो आहे. 'अभिजात' या शब्दाचे एवढे अवमूल्यन, सपाटीकरण या आधी कधी झालेले आढळत नाही. त्यामुळे अभिजात या शब्दाचे आपण सांस्कृतिक महत्त्व घालवून बसणार की काय अशी साधार भीती व्यक्त करण्याची वेळ आली आहे. नुकत्याच झालेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनात झालेल्या अध्यक्षीय भाषणात मराठीच्या अभिजाततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला. त्यात मराठीची अभिजातता टिकविण्यासाठी बोली भाषांचे जतन, संवर्धन आणि मराठी जनांनी एकत्र येऊन सर्वतोपरी प्रयत्न करण्याच्या कृतीवर भर देण्याची नितांत गरज असल्याची आवश्यकता असल्याचे सांगितले गेले. संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्या मराठीच्या अभिजाततेबाबत मांडलेल्या विचारातून त्यांनी मराठी अभिजात होण्यातील अडथळेच अप्रत्यक्षरीत्या आपल्या समोर ठेवले आहेत. त्यांचा म्हणण्याचा अर्थ काढायचा झाल्यास तो असा काढता येईल की, आदिवासी, जमाती, जाती, जंगले यांच्यात होणारा संस्कृतीचा तथाकथित प्रसार ही एक प्रकारे कित्येक भाषांसाठी मृत्युघंटाच असते. आज इंग्रजीच्या स्वरूपात ती सगळ्या जगावर वाजत आहे. गेल्या पाच-सात दशकांमध्ये इंग्रजीने जगातील बोलीभाषाच नव्हे तर प्रमुख भाषांसाठी देखील एक प्रकारची दहशत निर्माण केली आहे. त्याला मराठी अपवाद नाही. आपले राजकारणी व मराठी लेखक मातृभाषेविषयीच्या प्रेमाचा टेंभा पुन्हा पुन्हा मिरवतीलही. इंग्रजी व इतर कोणत्याही भाषेच्या आक्रमणाविरोधात उभे राहून मातृभाषेच्या सन्मानाचे रक्षण करण्याच्या शपथाही घेतील पण आपली सार्वजनिक भूमिका आणि वैयक्तिक आयुष्य यात दिवसेंदिवस अधिकाधिक तफावत होत चाललेली आहे हे सत्य आपण कसे नाकारणार! दुटप्पी बोलणे आणि दुटप्पी दर्जा याचे गारुड आपल्यावर चालून येणार असेल तर आपल्या मराठीचे 'अभिजात भविष्य' काय असणार! उच्चभ्रू मराठी लेखकांत हे चित्र आढळून येत असल्याकडे जरी आपण दुर्लक्ष केले तरी निम्नस्तरावर जगणारा सामान्य माणूसही भीक मागेल, पैसे उसने घेईल प्रसंगी कर्ज काढेल परंतु आपल्या अपत्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्यासाठी धडपडतोच ना! जी भाषा संवादाचे माध्यम म्हणून वापरली जाते तिचा उपयोग बहिष्कृत करण्याचे हत्यार म्हणून होतो हे आत्मविरोधी वाटत असेल तर तीच भाषा अडवणुकीचे माध्यम म्हणून वापरली जाते ही बाब विपर्यासाची पराकाष्ठा ठरते. इथे महासागर ओलांडण्याची काही गरज नाही. आपल्या घरातच ते चालले आहे. मराठी भाषेस अभिजात दर्जा प्राप्त होण्यात अडथळा आणण्यात कोणकोणत्या राजकीय व सांस्कृतिक अदृश्य शक्ती महाराष्ट्रातच कारणीभूत होत्या, याचा इतिहास ताजा आहे. भाषातज्ज्ञांनी शासनास सादर केलेल्या ५६ पानांच्या मराठी भाषा धोरणाला १२ पानांपर्यंत आटवून मराठी भाषेचे धोरण जाहीर केल्याने ते थांबणार नाही. आपली ऊर्जा नाना क्षेत्रांतील विविध विषयांवरील वेधक-गद्य-विज्ञान-तंत्रज्ञान लिहिण्यासाठी खर्ची घातली पाहिजे. जगात विविध ठिकाणी शास्त्रीय विषयांवरील असलेल्या साहित्याच्या अनुवादाकडे मोठ्या प्रमाणावर वळण्याची गरज आहे. त्यासाठी आपला विविध क्षेत्रांतील लेखनासंबंधीचा वाचनसंचार वाढायला हवा. मराठीजवळ ५४ बोलीभाषांचा खजिना आहे. इतर कोणाहीपेक्षा लेखकाचे भाषेशी मोठे जिव्हाळ्याचे नाते असते. तेच तिचे पूजक असतात. लेखक शब्दांना नवीन वळणे, नवे आकार देऊ शकतात. तेच भाषेला असाधारण संदर्भात वेगवेगळ्या पद्धतीने वापरू शकतात. मराठीतील गतकालीन शब्दांत प्राण फुंकू शकतात. हे सारे आपल्या भाषेला बंधने घालणाऱ्यांच्या विरोधात एक मोठी सैन्याची फळी उभी केल्याने साध्य होईल. पुढच्या पिढ्यांसाठी मराठीचे जतन त्यामुळेच शक्य होईल. तरच अभिजात दर्जाचा आनंद भविष्यात उपभोगता येईल. ■

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अवैधरित्या वाळूने भरलेल्या तीन ट्रॅक्टरचा सहा किलोमीटर पाठलाग

## चोरट्यांचा ट्रॅक्टर घेऊन पोबारा

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०२ मार्च**

माहूर तालुक्यातील मौजे हडसनी येथील वाळू तस्करांनी अवैधरित्या तीन ट्रॅक्टर मध्ये वाळू भरून आनमाळ येथे विक्रीसाठी नेत असताना तहसीलदार किशोर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड यांचेसह महसूल कर्मचाऱ्यांच्या पथकाने त्यांचा पाठलाग करत पकडण्याचा प्रयत्न करत असताना वाळू तस्करांनी जाणूनबुजून वाळूने भरलेल्या ट्रॅक्टरच्या मागे तर तहसीलदारांच्या वाहनाच्या पुढे तीन मोटारसायकली मधोमध चालवत अडथळा निर्माण केल्याने जवळपास पाच ते सहा किलोमीटर पाठलाग करुनही वाळू तस्करांनी पैनगंगा नदी पात्रातून पैलतीरीच्या विदर्भात वाळूने भरलेले ट्रॅक्टर घेऊन पोबारा केला.तर दुचाकीस्वारांना पकडण्याचा प्रयत्न केला असता दुचाकीस्वारांनी आपल्या दुचाकी सोडून पळ काढत चक्क ना.तहसीलदारांच्या महसूल पथकाला आता तुमचे अति होत आहे;तुम्हाला बघून घेऊ! अशी उघड धमकी दिल्याची खळबळजनक घटना दि.०१ मार्च रोजी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान घडली आहे.या घटनेमुळे अवैध वाळू तस्करीविरुद्ध माहूर तहसीलदार किशोर यादव यांनी अलिकडील काळात जवळपास तीन डझन वाहनांवर जप्तीच्या कारवाया करुनही संधीसाधून अधूनमधून वाळू तस्करी डोके वर काढत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीची पडसा येथे वाळू तस्करी रोखण्यासाठी गेलेल्या महसूल पथकाला वाळू तस्करांनी धमकी दिल्याची घटना ताजी असतानाच ही घटना घडल्याने तहसीलदारांसह महसूल पथकाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, महसूल पथकासोबत तात्काळ शस्त्रधारी पोलिसांची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.



तालुक्यातील पैनगंगा नदी पात्राजवळील हडसनी येथील वाळू तस्करी करणारे अनेक दिवसांपासून वाळू तस्करी करत असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस पाटील दिलीप नरवाडे यांनी माहूर तहसील कार्यालयात सूचना दिल्यावरून तहसीलदार किशोर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार डॉ.राजकुमार राठोड यांचेसह तलाठी सी.पी. बाबर, कोतवाल विष्णू देव्हारे, किसन लोखंडे, कोतवाल कैलास खूपसे,तंटामुक्ती अध्यक्ष सुखालाल राठोड यांना सदरील ठिकाणी आल्यावर आणमाळ घाटावर तीन ट्रॅक्टर वाळूने भरलेले येत असल्याचे दिसून आल्यावर सदरील महसूल पथकाने त्यांना थांबवण्याचा इशारा केला असता ट्रॅक्टर न थांबवता सर्व ट्रॅक्टर चालकांनी ट्रॅक्टर घेऊन पळ काढला.तर त्याचवेळी वरील तिघांनी आपापल्या मोटरसायकली ट्रॅक्टरचे मागे लावल्या तसेच शासकीय वाहन जवळ आले असता शासकीय वाहणाला भिडूनच मोटरसायकली चालवल्या काही अंतरावर त्यांनी रस्त्यात मोटरसायकल फेकून देत रस्ता अडविल्याने ट्रॅक्टर चालकांनी पैनगंगा नदी पात्रातून ट्रॅक्टर विदर्भात पळवून नेले त्यामुळे महसुली पथकाला ट्रॅक्टर पकडता आले नाही. सदर घटनेचा पाठलाग सुरू असताना नायब तहसीलदार डॉ.राजकुमार राठोड यांना स्वतः सह अधिनस्थ कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात घालून वाहन चालवात वाळू तस्करांचा जवळपास सहा किलोमीटर पाठलाग करावा लागला. मात्र वाळू तस्करांनी वाळूने भरलेले ट्रॅक्टर घेऊन विदर्भात पोबारा केला तर दुचाकीस्वारांनी दुचाकी सोडून पळ काढल्याने ना.त.राठोड व महसूल पथकाने दोन मोटारसायकली जप्त करून माहूर पोलिस ठाण्यात जमा केल्या आहेत.अनमाळचे पोलीस पाटील दिलीप नरवाडे यांच्या फिर्यादीवरून दोघांविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, चोरांना मदत करणे व इतर कलमाखाली गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास प्रभारी पोलीस निरीक्षक सपोनी शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोउपनी पालसिंग ब्राह्मण, पोहेकॉ. गजानन चौधरी, पो. कॉ. रोहित इंगोले, पो. कॉ. पवन राऊत हे करीत आहेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे,काही दिवसापूर्वी पडसा येथे तलाठ्यांना धमकी दिल्याप्रकरणी सिंदखेड पोलीस ठाण्यात दोघां विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, पथक प्रमुख डॉ. राजकुमार राठोड यांनाही कालच्या घटनेत गंभीर दुखापती होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती परंतु सुदैवाने ते बालंबाल बचावले. तसेच जाता जाता निर्ढावलेल्या मुजोर वाळू तस्करांनी आता तुमचे अति होत आहे;तुम्हाला बघून घेऊ! अशा गंभीर स्वरूपाच्या धमक्या सदरील महसूल अधिकारी कर्मचारी व ईतरांच्या पथकाला दिल्याने यानंतर अशा घटनेची पुनरावृत्ती होत राहिल्यास महसूल पथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे काही बरे वाईट झाले तर त्याला जिम्मेदार कोण? असा विचारणीय गंभीर प्रश्न या घटनेच्यानिमित्ताने निर्माण होत आहे. अशा होण्याआधी घटना वारंवार होऊ नये यासाठी खबरदारी म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार तसेच सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी घटनेची गंभीर दखल घेऊन महसूल पथका सोबत किमान दोन शस्त्रधारी पोलिसांची तात्काळ नेमणूक करावी अशी मागणी या घटनेनंतर महसूल प्रशासनासह पर्यावरणप्रेमी नागरीकांमधून करण्यात येत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### गौतम कांबळे यांची भारतीय बौद्ध महासभेच्या नांदेड उत्तर तालुकाध्यक्षपदी निवड

**नांदेड**-भारतीय बौद्ध महासभेच्या नांदेड-उत्तर तालुकाध्यक्षपदी गौतम कांबळे यांची निवड करण्यात आली. माता रमाई आंबेडकर बुद्ध विहा, सहयोगनगर, नांदेड येथे झालेल्या विशेष बैठकीत ही निवड करण्यात आली. गौतम कांबळे हे सांख्यिकी कार्यालयातील अधिकारी तसेच शांताई लक्ष्मण पेट्रोल पंपाचे संचालक असून, विधीतज्ञ म्हणूनही कार्यरत आहेत. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीनुसार धार्मिक आणि सामाजिक कार्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत भारतीय बौद्ध महासभेचे नांदेड जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड यांनी त्यांच्या निवडीचे पत्र दिले आहे. या बैठकीस जिल्हा सरचिटणीस दामोदर सरकटे, उपाध्यक्ष (संस्कार विभाग) सुरेश लोकडे, जिल्हा कार्यवाह सचिव भालेराव, दिगंबर मोरे व अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी तालुका सरचिटणीसपदी साहेबराव डोंगरे, कोषाध्यक्षपदी प्रल्हाद जोंधळे, उपाध्यक्षपदी अंबादास कांबळे, कैलास पोहरे, भगवान धबडगे, संभाजी सोनकांबळे, अंकुश हिवाळे आदींचीही निवड करण्यात आली. गौतम कांबळे व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे मित्रमंडळी व सहकाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.




### मरणोत्तर देहदान : अनंतश्रीविभुषित जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानचा उपक्रम



**नांदेड**-दि. २८ फेब्रुवारी रोजी बजरंग दत्तात्रय शेळके, वय ७४ वर्षे, रा. सावित्रीबाई फुलेनगर, नांदेड यांचे रात्री १०.५५ वाजता निधन झाले. ते निवृत्त पोलीस होते. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे चिरंजीव प्रेमचंद शेळके यांनी त्यांचा मरणोत्तर देहदानाचा फॉर्म जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान नाणिजधाम ता.जि. रत्नागिरी येथे भरून दिला होता. संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी तात्काळ त्यांच्या घरी जाऊन त्यांचा मृतदेह डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथे सुपूर्द करण्यात आला. अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेतून आम्ही हे देहदान करत आहोत, अशी प्रतिक्रिया त्यांचे चिरंजीव प्रा. प्रेमचंद शेळके यांनी बोलून दाखवली. ते स्वतः कीर्ती कॉलेज, दादर (मुंबई) येथे प्राध्यापक आहेत. जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान तर्फे नेहमीच समाजोपयोगी कार्य होत असतात. जसे की मरणोत्तर देहदान, अवयव दान, दरवर्षी रक्तदान, नांदेड जिल्ह्यात विविध हायवेवर मोफत दोन ॲम्बुलन्स सेवा, जेव्हा, ज्याला, जिथे रक्ताची गरज पडेल, तेव्हा त्याला तेथे जाऊन रक्त पुरवठा करणे असे विविध स्तुत्य उपक्रम जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान मार्फत चालतात. हे देहदान ज.न.म. संस्थानचे ८५ वे मरणोत्तर देहदान आहे. परमपूज्य जगद्गुरुश्रींच्या पन्नासाव्या जन्मोत्सवानिमित्त २०१६ मध्ये ५६ हजाराहून अधिक लोकांनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प केला होता व महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये मेडिकल कॉलेजला फॉर्म भरून दिले होते. त्यातील हे नांदेड जिल्ह्यातील पहिले व संस्थानचे ८५ वे मरणोत्तर देहादान आहे. या आगळ्यावेगळ्या व स्तुत्य अशा उपक्रमाबद्दल कुटुंबातील व्यक्तींचे व जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानचे व समाजाला एक योग्य दिशा देण्याचे कार्य करणाऱ्या परमपूज्य जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे. यावेळी रूक्मिनबाई शेळके (पत्नी), प्रा. प्रेमचंद शेळके, संतोष शेळके (मुले), वर्षा शेळके (मुलगी), ऋतुजा शेळके (सून), शीतलकुमार देगलूरकर (भाचा) यांच्यासह संस्थानचे पदाधिकारी सौ. संतोषी पाटील महिला पीठ निरीक्षक, डॉ. दर्शना राठोड, बालाजी राठोड, किशनराव मुंडकर जिल्हाध्यक्ष, संभाजी पाटील माऊलीकर जिल्हा सचिव, भारत रॅपनवाड नांदेड ता. सेवा समिती अध्यक्ष, अंबादास राठोड अध्यात्मिक प्रमुख, श्याम नागलगावे, विजय पांचाळ, लक्ष्मण कवडे, निलेश डोलावार, निलेश डोलावार, करणसिंह ठाकूर, गजानन घाटोळ, पोलाजी कानोडे, राधा कानोडे, सुनिता कवळे महिला जिल्हाध्यक्ष, नंदकुमार कलंत्री, सुधाकर अडकिणे, तुपकर ताई आदींची उपस्थिती होती.

### संत माता कमलाकौर यांचे निधन

**नांदेड**-संत बाबा जोगींदरसिंघ मौनी बाबा यांच्या परमसेवक संत माता कमलाकौर साधूसिंघ यांचे दि. १ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता वृध्दापकाळाने वाहेगुरु निवास ट्रस्ट सिंधी कॉलनी बाफना नांदेड येथे निधन झाले. त्या ९८ वर्षांच्या होत्या. संत माता कमलाकौर यांनी आपले संपूर्ण आयुष्य नांदेड हजूर साहिबमधील गुरु घरच्या सेवेसाठी समर्पित केले होते. संत बाबा जोगींदरसिंघ मौनी बाबा यांच्या सोबत त्यांनी अनेक वर्षे गुरुसेवा केली. नांदेडच्या सिंधी कॉलनीतील वाहेगुरु निवास ट्रस्ट, पुणे पिंपरी चिंचवड येथील गुरुद्वारा वाहेगुरु मान सरोवर उभारण्यात त्यांचा व साधुसिंघ यांचा मोठा वाटा होता. देशविदेशातून नांदेडला येणारे शीख, सिंधी भाविक त्यांचे दर्शन घेऊनच जात असतं. दि.२ मार्च रोजी दुपारी ३ वाजता संत मातांची अंतिम अरदास होणार असून नंतर वाहेगुरु निवास ट्रस्ट सिंधी कॉलनी बाफना नांदेड येथून त्यांची अंत्ययात्रा निघणार आहे. नगिनाधाट येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे पूज्य सिंधी समाज नांदेड, वाहेगुरु निवास ट्रस्ट आणि साधसंगतच्या वतीने कळविण्यात आले आहे. संत माता यांच्या निधनाने शीख, सिंधी समाजातील भाविकांनी दुःख व्यक्त केले आहे.



## आर.आर. मठदेवरु यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०२ मार्च**



येथील साधनानगर मध्ये वास्तव्यास असणारे सेवानिवृत्त मुख्याध्यापक रेवनआप्पा रामलिंगआप्पा मठदेवरु (आर . आर.मठदेवरू) यांचे पुणे सोलापूर महामार्गावर भिगवन जवळ कार अपघातात बुधवारी दि. २६ रोजी पहाटे ५ वाजता दुखद निधन झाले.

## बितनाळ शाळेच्या बाल वैज्ञानिकांनी भरवले विज्ञान प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ०२ मार्च**

तालुक्यातील मौजे बितनाळ येथे राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या औचित्याने दि. १ मार्च रोजी जि. प. के. प्रा. शाळा या ठिकाणी बाल वैज्ञानिक विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग सादरीकरण करून विज्ञान प्रदर्शन भरवले.

याप्रसंगी विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक भगवान संपतवार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नागनाथ घुमलवाड तसेच ज्येष्ठ पत्रकार साहेबराव तुरेराव, शिक्षण प्रेमी घुमलवाड सर व शाळेतील विज्ञान शिक्षक वैभव मोटरवार व शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत पार पडले. विज्ञान प्रदर्शनाची सुरुवात नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ 'सी. व्ही. रमण' यांच्या प्रतिमेच्या पुजनाने करण्यात आले. छोट्या-छोट्या प्रयोगातून इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः प्रयोग करून दाखवून वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट केल्या. प्रश्न विचारा पुन्हा-पुन्हा असेच का? आणि तसेच का? शिकणे कधी संपत नाही, होऊ द्या लाख चुका! या कवितेच्या ओळीप्रमाणे विद्यार्थ्यांनी स्वतःच्या मनातील कुतुहल स्वतः प्रयोग करून पाहून वैज्ञानिक तत्व जाणून घेतले आणि शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही समजून सांगितले. विविध प्रयोगामध्ये- हवेचा दाब अभ्यासणे, हवेला वजन असते, पाण्याची घनता, उष्णतारोधक फुगा, ज्वलनास ऑक्सिजन मदत करतो, उडणारे रॉकेट, मानवी श्वसन संस्था, पाण्याचा पृष्ठीय ताण असे विविध प्रयोग विद्यार्थ्यांनी सादर केले.



सादरकर्ते बालवैज्ञानिक अनुराधा घोसलवाड, आकांक्षा कोंडेवाड, शाफीना सय्यद, आकांक्षा सूर्यवंशी, गुंजन जाधव, आरुषी मॅकलवाड,श्वेता घोसलवाड, स्नेहा जाधव, सार्थक मंतलवाड, कर्तव्य पलेलवाड, साईनाथ घुमलवाड, ओंकार आटपलवाड, मारुती कोरलेलू ,नितेश पुन्नावाड, शुभांगी सूर्यवंशी, रूपाली कोंडेवाड इत्यादी विद्यार्थ्यांनी प्रयोग सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक घोगरे यु. एस. , शिवनखेडकर शरद, वडमिले एल. के., कळसकर के. एन., पेंडलवार एस. पी., शेख मौला, कल्याणकर एम. बी., तांबरे आर. जी. व विज्ञान शिक्षक वैभव मोटरवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## डॉ. राहुल जाधव यांनी घेतलेल्या अरोग्य शिबीराला मोठा प्रतिसाद

### मोफत शिबीरात आरोग्य ३४५ रुग्णांनी केली तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ०२ मार्च**

शहरातील डॉ. राहुल जाधव यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जंयती निमित्य आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने उमरी येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम संत सेवालाल महाराज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुष्प पूजा करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर उमरी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अध्यक्ष डॉ. क्रांती शिलेदार यांच्या हस्ते या आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले या आरोग्य तपासणी शिबिर तपासणी करिता तज्ञ (डॉ. ललकार लक्ष्मण गडोड अस्थिरोग सांधे प्रत्यारोपण फिनिक्स हॉस्पिटल नांदेड)व डॉ. संदीप चव्हाण मधुमेह व हृदयरोग तज्ञ काकांडीकर हॉस्पिटल नांदेड) या शिबिरामध्ये पुढील आजाराची गुडघे मणके कंबर पाट हृदयाचआजार फुफुसाचे आजार मधुमेह रक्तदाब हृदय रोग टी.बी टायफाईड मलेरिया कावीळ पांढरा कावीळ डेंग्यू रोगांची तपासणी करण्यात आली या शिबिरात ३४५ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.



या आरोग्य शिबिराच्या प्रस्ताविक मध्ये बोलताना डॉ. राहुल जाधव म्हणाले की संत सेवालाल महाराज व छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीच्या गोरगरीब जनतेचे हित जोपासल या दोन्ही महापुरुषांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवून या दिनांक २७ फेब्रुवारी रोजी उमरी येथील साई क्लीनिक गोजे कॉम्प्लेक्स एसबीआय बँके जवळ भव्य मोफत आरोग्य शिबिर ठेवण्याचा संकल्प हाती घेतला होता या संकल्प मध्ये माझी पत्नी डॉ. कल्पना राहुल जाधव यांचाही मोठा सहभाग आहे.

या शिबिरात सहकार्य करण्यासाठी नांदेडचे तज्ञ डॉ.ललकार लक्ष्मण गडोड डॉ. संदीप चव्हाण व तसेच या शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले उमरी ग्रामीण रुग्णालयाचे आयुष्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्जुन शिंदे व खाजगी वैद्यकीय संघटनेचे अध्यक्ष डॉ. निरंजन खानसोळे माझ्या विनंतीला मान देऊन या शिबिरामध्ये सहभाग नोंदवला बद्दल त्यांचे मी त्यांचे आभार व्यक्त करतो असे डॉ राहूल जाधव म्हणाले. यावेळी शुभम शिंदे आधीसह रुग्णांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. डॉक्टर व सर्व टिम ने उत्कृष्ट अशी सेवा दिल्याने रुग्णही समाधान व्यक्त केले आहे.

## जलसिंचन योजनासाठी घेतलेले कर्ज माफ

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी ,दि. ०१ मार्च**

कुंडलवाडी येथूनच जवळ असलेल्या गोदावरी नदीवर उपसा जलसिंचन योजना साठी घेतलेले कर्ज शासनाने कर्ज माफ केल्या मुळे विद्यमान चेअरमन सुनील बेजगंमवार यांच्या प्रयत्नाला यश आल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कुंडलवाडी विविध सेवा सहकारी सोसायटीने शेतकऱ्यांना शेती साठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी २९ वर्षा पूर्वी शेळगावं , चेन्नापुर , माष्टी,पाटोदा, कुंडलवाडी येथील ५६९ शेतकऱ्यांच्या सातबाऱ्या वर २ कोटी ५ लाख २७ हजार कर्ज घेतले होते व, १९९४ मध्ये काम पुर्ण झाले परंतु पाण्या अभावी शेतकऱ्यांना पाणी मिळालेच नाही पण सातबाऱ्या वर मात्र बोजा तसाच राहिला त्या मुळे व्याज व मुद्दलाची रककम वाढत गेल्या मुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला व जमीन खरेदी विक्री करण्यासाठी अडचणी येत होत्या त्यामुळे सन २००२ मध्ये दिवंगत चेअरमन के. बी. रेड्डी व माजी चेअरमन साईनाथ उत्तरवार यांनी कर्ज माफी साठी प्रयत्न सुरु केले.

## ग्रामस्थांसह पोलिसांच्या पुढाकाराने पानोळ्यात दारूबंदीचा अभिनंलनीय निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०२ मार्च**

माहूर तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ भागात असलेल्या मौजे पानोळा येथील प्रतिष्ठित नागरीक, महिला व माहूर ठाण्याचे स.पो.नि शिवप्रकाश मुळे यांच्या अथक प्रयत्नातून अंततः सर्व गावकऱ्यांनी आयोजित केलेल्या सभेत गावात दारू विक्री करणे व दारू पिणे बंद! असा संकल्परुपी धाडसी निर्णय घेत स्वतःहूनच सर्वांनी स्वतःवर बंधन लादून घेतला आहे. सपोनी शिवप्रकाश मुळे यांच्या या कौतुकास्पद आणि उल्लेखनीय उपक्रमाची तालुका भरात चर्चा होत सुरू असून, त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

मौजे पानोळा गावात अनेक महिन्यांपासून सपोनी शिवप्रकाश मुळे, येथील सरपंच रमेश कुडमेथे, तंटामुक्ती अध्यक्ष शेषराव राठोड, पूनीबाई आडे, पवन चव्हाण, पो.हे.कॉ. प्रकाश गेडाम, पो.कॉ. ज्ञानेश्वर वेलदोडे यांचेसह निर्व्यसनी गावकरी गावात दारू विक्री बंद व्हावी तसेच हातभट्टीची दारू नागरिकांनी पिणे बंद करावे यासाठी कसोशीने प्रयत्न करत होते. अंततः यासाठी सर्व गावकऱ्यांनी मिळून सपोनि शिवप्रकाश मुळे यांना गावात बोलावून गावात शंभर टक्के दारू बंद करण्याचा निर्णय घेतला.



यावेळी गावातील नागरिकांनी शपथ घेऊन गावातील सर्व महिला समक्ष दारू विक्री आणि दारू पिणे बंद करण्याबाबतचे निर्बंध स्वतःहूनच स्वतःवर लादून घेतले. यावेळी सपोनी शिवप्रकाश मुळे यांनी दारूमुळे होणारे दुष्परिणामांची सखोल माहिती दिल्याने नागरिकांचे हृदय परिवर्तन होऊन त्यांनी आता चक्क यापुढे दारु विक्री व पिणे बंद करण्याची शपथ घेतल्याने सदरील कार्यक्रमाची तालुका भरत चर्चा होत आहे. यावेळी स.पो.नि. मुळे यांनी तालुक्यातील प्रत्येक गावात गाव पुढाऱ्यांनी दारुबंदी करण्यासाठी पुढाकार घ्यावा व गोरगरिबांचे उघड्यावर येत असलेले घर संसार वाचवण्यासाठी प्रयत्न करावेत असे कळकळीचे आवाहनही केले.

स.पो.नी. शिवप्रकाश मुळे यांची आपल्या विशिष्ट शैलीने परिसरात गुन्हेगारी रोखण्यासाठी दबंग तेवढीच सिंघम म्हणून ओळख होती त्यासोबतच आता त्यांची 'व्यसनमुक्ती सम्राट' म्हणून देखील नवीन ओळख निर्माण झाल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे.

## राष्ट्रीय बाल आरोग्य, स्वास्थ्य विशेष तपासणी शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०२ मार्च**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य आरोग्य तपासणी मोहीम राबविण्यासाठी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.बारी यांनी मार्गदर्शन केले या मोहिमेत सर्वंकष बालकाच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी २८ फेब्रुवारी ते ३१ मार्च पर्यंत तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.सर्वांनी शिबिर मोहिमेत बालकांच्या आरोग्याची तपासणी करुन घ्यावी. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आरोग्य मंत्री यांच्या संकल्पनेतून १ मार्च २०२५ रोजी राज्यातील ० ते १८ वर्ष वयोगटातील सर्व बालकांची सर्वकष आरोग्य तपासणीसाठी २८ फेब्रुवारी ते ३१ मार्च पर्यन्त मोहिम राबवण्याचे आयोजन केले आहे. बालकाची सर्वंकष तपासणी करण्यासाठी लोहा येथील जिल्हा परिषद शाळेत शिबीराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ बारी यांच्या हास्ते उद्घाटन करुन या शिबिरात १९ बालकाला किरकोळ आजाराचे औषधपचार केले तर ३ बालकाला संदर्भित करण्यात आले या शिबिराचे उद्घाटक तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगदीश कांबळे ,श्रीमती अंमलवाडबाई शिक्षण विस्तार अधिकारी,मुख्याध्यापक कंवर, डॉ. बसवराज लोहारे , डॉ.गणेश मुदखेडे , डॉ. मंगेश पांडे ,श्रीमती डॉ. मिर्झा ए. एफ, डॉ. ऋजुता देशपांडे, डॉ. स्मिता देशमुख, श्रीमती प्रियंका भगत, धनंजय संगवे, संतोष इंगळे, श्रीमती सुनिता सोनटक्के , श्रीमती वर्षा पवार,रवि भालेराव तालुका आरोग्य कार्यालय लोहा यासह शाळेतील सर्व शिक्षक कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



## हिंन्दु धर्माचा उपयोग स्वत: च्या स्वार्थासाठी न करता धर्म रक्षा करा : देवकीनंदन ठाकूर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०२ मार्च**

हिंदूस्थानातील हिन्दुंनी धर्माचा उपयोग स्वतःच्या स्वार्थापोटी न करता निस्वार्थ पणे धर्माचे रक्षण करा असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते देवकीनंदन ठाकूर महाराज यांनी श्री क्षेत्र उमरज येथील १०८ कुंडी यज्ञ कलशारोहण कार्यक्रमात भंकांताना संबोधताना केले. पुढे बोलताना देवकीनंदजी असे म्हणाले पैसा हा सर्वस्व नाही, कुंटूबाला वेळ द्या, तुमच्या मुलाबाळांना शिक्षण द्या, चांगले संस्कार मणुष्याच्या जिवनात पैसा सोबत येत नाही तर संस्कार व कर्तव्यांनी शेवटी नाव शिल्लक राहते. यावेळी हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती. श्री क्षेत्र उमरज संस्थानच्या वतीने आयोजित श्रीमद् भागवत कथेला सुरूवात दि. २७ फेब्रुवारी पासून झाली आहे. देवकीनंदन ठाकूर महाराज यांच्या कथा श्रवणाला भाविक भक्तांची अलोट गर्दी उसळली आहे. आपल्या रसाळ व मधाळ कथेतून त्यांनी तुमच्या लेकरांचे पालन पोषण करता तसे धर्माचे पालन करणे हे तुमचे कर्तव्य आहे. आईच्या चित्तात सदैव आपल्या लेकराचे हितच असते. केवळ आपल्या लेकराचे कल्याण व्हावे यासाठी रात्रंदिवस ती कष्ट करून त्याला जपत असते ती माता असते. वेळ प्रसंगी स्वतःचा जीव गेला तरी चालेल पण माझं बाळ वाचलं पाहिजे यासाठी तळमळत राहणारी म्हणजे ती आई असते.




त्याचप्रमाणे संतही वेळप्रसंगी आपला जीव धोक्यात घालतात परंतु माणूस हा माणूस बनून राहिला पाहिजे आणि देवाचा लाडका झाला पाहिजे यासाठी रात्रंदिवस तळमळत असतात. आई आणि संत एकच असतात म्हणून देवकीनंदनजी ठाकूर महाराज यांनी श्री क्षेत्र उमरज येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा वाचन करताना केले.

पुढे म्हणाले की देवकीनंदन ठाकूर यांनी सनातन धर्माच्या रक्षणासाठी सनातन बोर्डाच्या गठनाची गरज व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले आहे की, हा बोर्ड सनातन संस्कृतीचे रक्षण करेल आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी उपयुक्त ठरेल. वक्फ बोर्ड असू शकतो, तर सनातन बोर्ड का होऊ शकत नाही ?असेही ते म्हणाले . धर्म आणि देशाच्या रक्षणासाठी सनातन बोर्डाचे गठन करणे आवश्यक आहे असेही महाराज म्हणाले,तसेच धर्माची रक्षा करते वेळी काही बंधन आले,तर ते तोडून टाका व धर्माची रक्षा करा,देवकीनंदनजी ठाकूर महाराज यांनी श्री क्षेत्र उमरज येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा वाचन करताना केले.

श्रीक्षेत्र उमरज येथे लातूरचे खासदार म्हणाले कि क दर्जा मधून ब दर्जामध्ये नेण्याचा प्रयत्न करतो, येणाऱ्या काळात सदरील कामासाठी सोयी सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न करेल असे प्रतिपादन लातूरचे खा.काळगे म्हणाले,यावेळी श्रीसंत नामदेव महाराज संस्थानचे मठाधिपती महंत एकनाथ महाराज, मुखेड चे आमदार तुषार राठोड, कंधार लोहा मा.आ ईश्वरराव भोसीकर, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाचे ) पक्षाचे नेते ॲड.मुक्तेश्वर धोंडगे,माधवराव पेठकर,माजी नगरसेवक शोभाताई नळगे, माजी जि.प.सदस्य संध्याताई धोंडगे,माजी नगरसेवक गणेश कुंटेवार,,माजी नगरसेविका वर्षाताई कुंटेवार,उमरजचे सरपंच जयश्री केंद्रे आदींसह हजारों भाविक भक्तांची उपस्थिती होती.

# मराठवाड्यावर कायमस्वरूपी अन्यायकारक ठरणारा गोदावरी अभ्यास गट ०२ मांदांडे समितीच्या अहवालाच्या विरोधात जनजागृती अभियान -डॉ.संजय लाखे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

समन्यायी पाणीवाटप धोरणाचा पुनर्विचार करण्याच्या बहाण्याने राज्यसरकारने स्थापन केलेल्या 'गोदावरी अभ्यासगट क्र.०२ च्या समितीने श्री. प्रमोद मांदाडे (महासंचालक मेरी, नाशिक) यापूर्वीच्या क्र.०१ च्या मेंढेगिरी समितीने जायकवाडी प्रकल्पात पावसाळ्यानंतर ६५ टक्के जलसाठ्याची अट निश्चित केली होती नव्या मांदाडे समितीने ती तब्बल ७ टक्क्यांनी घटवून ५८ टक्के करण्याची शिफारस केली असून, तसा मराठवाड्यावर घोर अन्याय करणारा अहवाल राज्यसरकार कडे सादर केला होता आणि सदर अहवाल राज्यसरकारने मान्य करून चथठठ– महाराष्ट्र राज्य जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाकडे (एम.डब्लू.आर.आर.ए.) पाठवला होता. आता चथठठ– ने तो अहवाल आपल्या संकेतस्थळावर टाकला असून, त्याचा अभ्यास केला असता त्या अहवालाने जायकवाडी मराठवाड्यावर कश्याप्रकारे अधिकचा अन्याय करता येईल याचा वस्तुपाठच या अभ्यास गटाने घालून देऊन जायकवाडी धरणात किमान ६५% पाणी पातळी राखण्याचे गोदावरी अभ्यास गट क.०१ ची बंधनकारक आणि वैध तरतूद मोडीत काढून आता त्यात कपात करून केवळ ५८% पाणीपातळी शिफारशीत केली असून त्यामुळे वरून सोडायच्या पाण्यात सरळसरळ ०८ टिएमसी पाणी कपात प्रस्तावित करण्यात आली असून यामुळे टंचाईच्या काळात तब्बल १ लाख हेक्टर सिंचनावर परिणाम होणार असून पिण्याच्या पाणीपुरवठा सर्व योजनांत १३ टक्के तर उद्योगांना/बिगर सिंचन १७ टक्के कपात होईल आणि पर्यायाने मराठवाड्याच्या तोंडचे, शेती, सिंचन, उद्योग व्यापार यासाठीचे पाणी पळवण्याचा हा घाट घातला आहे. असा गंभीर व वस्तुनिष्ठ आरोप मराठवाडा अनुशेष निर्मुलन आणि विकास मंच चे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखेपाटील यांनी केला.

मांदाडे समितीच्या अन्यायकारक शिफारशी संदर्भात पुढे बोलतांना त्यांनी सांगितले की, राज्यसरकारने नेमलेले 'मांदाडे' समितीचा अहवाल अनेक महिने दडवून ठेवला होता आणि तो सार्वजनिक न करताच त्याची मराठवाड्यावर अन्यायकारक अंमलबजावणी चालू करण्याचा राज्यातील



सत्ताधाऱ्यांचा कुटील डाव होता. परंतु त्याविरोधात मराठवाड्यात तज्ञां मधे मोठ्या प्रमाणात पण दबक्या आवाजात चर्चा चालू झाल्या होत्या आणि त्यानंतर मी स्वतः जायकवाडी समन्यायी पाणीवाटप याचिकाकर्ता या नात्याने दि ०४/०२/२०२५ रोजी चथठठ– ला एक ईमेल पाठवून अहवाल सार्वजनिक करा नसता जनजागृती करत आंदोलन करावे लागेल. प्रसगी न्यायालयात जावे लागेल असा इशारा दिल्यानंतर हा २८१/२८४ पानाचा 'गोदावरी स्टडी ग्रूप (२) चा म्हणजेच 'मांदाडेसमिती'चा अहवाल' मागच्या आठवड्यात चथठठ– ने आपल्या संकेतस्थळावर जाहीर केला आहे.! आणि यातून कश्या–अधिकच्या कारणाने जायकवाडीवर म्हणजे पर्यायाने मराठवाड्यावर अन्याय करता येऊ शकतो. याचा छान वस्तुपाठच नगर नाशिक चे कायम गुलाम असलेल्या राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दाखवून दिला आहे! गोदावरी स्टडी ग्रूप (२) म्हणजे मांदांडे समितीने बाष्पीभवनाद्वारे तब्बल ६.७० टीएमसी (जायकवाडी विस्तीर्ण पाणीसाठ्यातून होणारे) बाष्पीभवन या अहवालात कमी करून टाकले आहे.! बरं गोदावरी स्टडी ग्रूप (१) मेंढेगिरी समिती आणि स्टडी ग्रूप (०२) मांदाडे समिती या दोन्ही समिती अहवालात जायकवाडी पाणी साठा / साठ्याचे प्रक्षेत्रावर पसरलेले पाणी सारखेच असताना या नवीन (मांदाडे समिती) अहवालात जायकवाडीत होणारे बाष्पीभवन अतिशय कमी दाखवले आहे. आणि त्याप्रमाणात पाणी कमी केले आहे आणि पहिली मेख मारली आहे.! मांदांडे समिती अभ्यास गटाने बाष्पीभवनाची मोजणी करताना फक्त एकाच वर्षाच्या आकडेवारीचा आधार घेतला असून २०१२ च्या पहिल्या मेंढेगिरी समिती अहवालात आणि मुळ तरतूद ६६४.८३ चर्ली असतांनाच आणि तसे नियोजन परंपरागत होत असतांना आता नवीन अहवालात तेव्हढाच पाणीसाठा असताना बाष्पीभवन केवळ २०६. ६८ दलघमी होत आहे गृहीत धरले आहे आणि हातचलाखी करून तेव्हढे पाणी कमी करत सरळ ६.७० ींल पाण्यावर घाला घातला आहे!म्हणजेच २०१२ नंतर जायकवाडी पाणीसाठ्यावर 'ऊन्हात नाही तर थंडीत वाढ' झाली आहे असे अजब तर्कट लावले असून त्यापोटी पाणीकपात सूचवली आहे.

तसेच वरच्या भागात क्षमतेपेक्षा आणि बच्छावत आयोग आणि तद्नंतर विविध न्यायालयीन निवाड्यातून जायकवाडी धरणाच्या वरच्या भागात परवानगीच्या दुपटीने धरणे बांधली असून तेव्हढा अवैध पाणीवापर दांडगाई ने प्रस्थापित केला असून त्यामुळे जायकवाडी हे प्रचंड तुटीचे धरण बनले असून ते दरवर्षी भरत नाही! त्यामुळे हा असा साठा वजा करणे योग्य नाहीच पण् अतिशय अन्यायकारक आहे! मराठवाडा ही संतांची भूमी आहे आणि लोकप्रतिनिधी अद्याप आग्रही तर सोडा जागृत नाहीत.! त्यामुळे सर्वसामान्य सजग नागरिक, विविध सामजिक संघटना यांनी हजारोंच्या संख्येने यावर आक्षेप नोंदवले पाहीजेत/आरपारच्या लढाईसाठी तयार व्हायला हवे.! नसता आता आपण शांतच राहिलो तर नगर नाशिक कर कोरड्या जायकवाडीतच 'आयपीएल' चे सामने आयोजीत करण्यालाही कमी करणार नाहीत! कारण त्यांना काहीना काही खुसपट काढून जायकवाडीत पाणी येऊन द्यायचेच नाही ही वस्तुस्थिती आहे. तर दुसरीकडे राज्यसरकार पश्चिम वाहिनी नार पार अंबिका, औरंग्या, पिंजाळ या नाशिक च्या वर सह्याद्रीच्या डोंगररांगा मधून बारमाही वाहणाऱ्या आणि अतिशय विपूल पाणी असलेल्या नद्यातील तब्बल १५० टीएमसी पाण्यासाठी सुध्दा गोदावरी व जळगाव धुळ्याची गिरणा नदी पात्रात वळवण्याचे गाजर दाखवून, राणा भिमदेवी घोषणा करत आहे पण प्रत्यक्षात अगदी उलट कृती करून महाराष्ट्राच्या अधिकारातले आणि नाशिक, अहिल्या नगर, मराठवाडा खानदेशला दुष्काळमुक्त करण्याची क्षमता असलेले १५० टिएमसी पाणी गोदावरी गिरणा मधे संपुर्णतः न वळवता म्हणजे पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी हे गाजरच आहे तर जायकवाडी चे पाणी टोकरून टोकरून कमी केले जात आहे! आणि तरीही आपण आत्ताही जागृत झालो नाही तर भविष्य आणि पुढची पिढी आपणास माफ करणार नाही म्हणून महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरण ने येत्या १५ मार्च पर्यंत मागवलेल्या हरकती आणि सुचनांवर मराठवाड्याच्या हितासाठी मोठ्या प्रमाणत शेतकरी, सहकारी साखर कारखाने महानगर/नगर पालिका स्थानिक स्वराज्य संस्था, आमदार खासदार लोकप्रतिनिधी आजी माजी पदाधिकारी उद्योग व्यापार संघटना यांनी आक्षेप नोंदवावेत. असे आवाहन मराठवाडा अनुशेष निर्मुलन आणि विकास मंच चे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखेपाटील आणि सहकारी यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस सुभाष कोळकर, शरद देशमुख, यू.डी. देशमुख, माऊली कदम, राजेंद्र गोरे, डॉ. इनामदार उपस्थित होते.

## संक्षिप्त

### अज्ञात वाहनाच्या धडकेत महाविद्यालयीन विद्यार्थ्याचा मृत्यु तर तिघे जखमी



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील सोनखेडा फाट्यावर आज्ञात वाहनांच्या धडक बसल्याने बीएस्सी चे फॉर्म भरण्यासाठी जाफराबाद कडे येणाऱ्या विद्यार्थ्यांना अपघात झाला यामध्ये तिघेही जबर जखमी झाले अशी प्रथमीक माहिती असून यामधील एक अरबाज सत्तार पठाण हा मुत्यू झाल्याची घटना घडली असल्याचे सुत्राची माहिती आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी सोनाटी ता मेहकर जिल्हा बुलढाणा येथील सर्व विद्यार्थी हे दुचाकीवरून जाफाराबाद कडे बीएस्सी चे फॉर्म भरण्यासाठी येत असताना सोनखेडा फाट्यावर भरधाव आज्ञात वाहनाची धडक बसून तिघेजण जखमी झाले होते याना तातडीने जालना येथील विघ्नहर्ता हॉस्पीटल मध्ये हलविण्यात आले यावेळी यातील पंकज दिलीप बदर वय अंदाजे २२, आदिनाथ मनोहर जाधव वय अंदाजे २२, हे दोन जखमी आहे तर एक अरबाज सत्तार पठाण वय अंदाजे २२ हा मुत्यू झाल्याची घटना घडली असे जाफाराबाद पोलीसांनी... माहिती दिली.. दोघाची प्रकूती गंभीर असून त्यांना जालना येथील विघ्नहर्ता हॉस्पीटल मध्ये उपचारासाठी पाठविण्यात आले असल्याचे सुत्राची माहिती आहे.. सदरील.. विद्यार्थी हे बुलढाणा जिल्ह्यातील असून अपघात झाला तेव्हा नागरीकांनी तातडीने जाफाराबाद पोलिसांना माहिती देऊन घटनास्थळी धाव घेतली व जखमी ना औषध उपचारासाठी तातडीने जालना हलविले आहे... सदरील.. अज्ञान वाहनांची चौकशी सुरू आहे.. याकडे पोलीस उपनिरीक्षक पवार यांनी तात्काळ सुत्र हलवून शोध मोहीम सुरू केली असल्याचे सांगितले आहे

### भाजपाच्या तालुका उपाध्यक्षपदी डॉ.संजय देशपांडे



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन शहरातील भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ कार्यकर्ते डॉ. संजय विनायकराव देशपांडे यांची भोकरदन तालुका भारतीय जनता पक्षाच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. सदरील निवड झाल्याचे तालुकाध्यक्ष गणेश ठाले यांचे पत्र त्यांना शुक्रवार दिनांक २८ रोजी पंचायत राज समितीचे अध्यक्ष आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते देण्यात आले आहे.

भाजपाचे तालुकाध्यक्ष गणेश ठाले यांनी दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की भारतीय जनता पक्ष हा जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असून या पक्षाचे ध्येय धोरणे तसेच केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार व राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार यांच्यामार्फत होणाऱ्या जनकल्याणकारी कामांचे वयोजनांची माहिती तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्या साठी आपली माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, आमदार संतोष पाटील दानवे व भाजपाचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांच्या शिफारशीनुसार या पदावर नियुक्ती करण्यात आली असून या पुढील काळात आपण पक्ष वाढीसाठी काम करावे. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मुकेश चिने, ज्ञानेश्वर पाटील तळेकर व इतर भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदर्श नगरमधील ग्रामोन्नती शाळेतील रंगतरंग कार्यक्रमात चिमुकल्यांनी उठविली धमाल

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

शहरातील आदर्श नगर भागातील ग्रामोन्नती इंग्लिश शाळेच्या प्रांगणावर २५ फेब्रवारी मंगळवार रोजी सकाळी ११ वाजता स्नेह संमेलनानिमित्त रंगतरंग या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यात विविध नृत्य तथा कलाप्रकारांची बहारदार मेजवानी प्रेक्षकांनी अनुभवली यात देशभक्ती, लावणी, कव्वाली, मंगळागौर, बाईपण भारी देवा, आरंभ ,कच कच कांदा,सोल्जर डान्स, छत्रपती शिवाजी महाराज,भिम गिते,हनुमान चा–लीसा,चला जेजुरीला जाऊ,करिष्मा स्पेशिकल, ,बाई मी लाडाची गं लावणी,यासह गोंधळ वासुदेव ,भारुड ,गवळण ,मुकाभिनय , एकांकिका, कोळी–गीत समूहगीत अशा विविध कला प्रकारावर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ठेका घेतला होता . यावेळी उप–स्थित रसिकांनी दाद देत भरघोस बक्षिसांची पावतीही दिली




सायंकाळच्या ५ वाजेपर्यंत चाल–लेल्या कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर गाढे सरपंच रघुनाथ पंडीत, उद्घाटक म्हणून गट साधन केंद्राचे तंत्र स्नेही भानुसे, सरपंच रघुनाथ पंडीत मुख्याध्यापका रत्ना भिसे , म. पत्रकार संघाचे ता . अध्यक्ष मुकेश भारद्वाज, राजेश वाघ, नितिन,राऊत, राहूल गवई, अश्विन हिवाळे, सागर दांडगे, शाकेर सिद्दीकी , योगेश जाधव, शे वसिम, बेबीनंदा कणखर, यांनी उपस्थित राहून मुलांचा उत्साह वाढविला कार्यक्रमाचे प्रास्ताविक मु .अ रत्ना भिसे, बहारदार सूत्रसंचालन , वनिता बोडखे व वैशाली राऊत यांनी केले , तर मिनाक्षी पैठणे व मनीषा टोम्पे यांनी स्वागत गित गायले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मु .अ भिसे,उपमुख्याध्यापक दमोता, गाडेकर, सुधाकर गोफणे, स्वप्नाली पडोळ, मिनाक्षी पैठणे, सिंधु भालेराव,वनिता बोडखे, वैशाली राऊत, मनिषा टोम्पे ,प्रमिला मिसाळ यांच्यासह शाळेच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले .

यावेळी शहर तथा परिसरातील पालक रसिक व सर्व स्तरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उप–स्थित होते.

# जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे केली रिक्त पदे भरण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील गोरगरीब रुग्ण औषधोपचार घेतात. आरोग्य विभागातील नागरिकांच्या दृष्टीने हे भोकरदन रुग्णालय महत्त्वाचे आहे. मात्र तरीही या रुग्णालयात आवश्यक डॉक्टर, आरोग्य कर्मचारी व तज्ज्ञांची पदे रिक्त आहेत. रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आदीसह अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष दीपक मोरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या कडे निवेदन देऊन मागणी केली आहे ग्रामीण रुग्णालयात औषधीचां देखील तुडवला जाणवत आहे तो देखील वाढवून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे

ग्रामीण रुग्णालयात ३० पदे मंजूर तर ९ पदे रिक्त आहे मागील काही दिवसांपासून ज्या सहा महिन्याच्या ऑर्डर (बॉन्डेड) घेऊन परिचारिका आल्या होत्या त्यांचा देखील कार्यकाळ संपल्यामुळे त्या जागा देखील रिक्त असल्याने जे कर्मचारी आहे त्यांच्यावर जास्त कामाचा भार पडत आहे रुग्ण संख्या जास्त असल्याने त्यांच्यावर उपचार करण्यात दिरंगाई निर्माण होत आहे कर्मचारी संख्या कमी पडत असल्याने रुग्णालयात रुग्णांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. भोकरदन ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरूपी पदे ३० आहे तर यात ९ पदे हे रिक्त आहेत यात विशेषता महत्त्वाचे मानले जाणारे अनेक महत्त्वाचे पदे रिक्त आज रोजी वस्त्वित पाहता १ कनिष्ठ



लिपिक, अधीपरीचारिका २,औषध निर्माण अधिकारी २, वाहन चालक १, दंत चिकित्सक १, सफाई कामगार १, असे ९ पदे रिक्त आहेत रिक्त पदे भरल्यास रुग्णांना याचा मोठा फायदा होणार आहे. भोकरदन तालुक्याची लोकसंख्या लक्षात घेता, कर्मचारी यांचा आढावा घेऊन कर्मचारी वाढवता कशे येईल याची माहिती घेऊन या बाबत जिल्हा शल्यचकित्सक यांना बोलून रिक्त पदे मंजूर करून रुग्णांची गैरसोय होणार नाही व रुग्णांना लवकर उपचार कसा करता येईल याची देखील दखल घेतली जाणार आहे भोकरदन ग्रामीण रुग्णालय हे रुग्णांच्या बाबतीत जिल्ह्यात जास्त रुग्णांची संख्या म्हणून ओळखल्या जात आहे तालुक्यातील अपघातांची संख्याही मोठी वाढत चाली आहे. अशा वेळी या परिसरात ग्रामीण रुग्णालया व्यतिरिक्त एकही मोठे शासकीय रूग्णालय सेंटर नसल्याने रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे व नवीन उपजिल्हा रुग्णालयाचे काम देखील वेगाने सुरु आहे रुग्णालयामुळे रुग्णांची देखील गैरसोय दूर होणार असून, रुग्णांना अत्याधुनिक सोयी–सुविधा उपलब्ध होणार आहे

# कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलमध्ये २ दिवसीय विज्ञान प्रदर्शनाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील नामांकित कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलमध्ये आयोजित दोन दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन आज शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी शाळेचे संस्थापक अध्यक्ष विनायककुमार कोठारी यांच्याहस्ते झाले. पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सौरऊर्जा, चंद्रयान, रेन वॉटर हार्वेस्टिंग, पर्यावरण संवर्धन, ग्रामर प्रोजेक्ट हॉटे सेन्स, पाणी वाचवा, पाणी आडवा, पाणी जिरवा अशा विविध महत्त्वपूर्ण १८० विज्ञान प्रकल्पांनी प्रदर्शनाला वेगळीच झळाळी प्राप्त करून दिली.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती लोंढे, ग्रीनलँड स्कूलच्या संचालिका श्रीमती कटके, शाळेच्या संचालिका छायादेवी कोठारी, सचिव प्रसन्ना कोठारी, कोषाध्यक्ष तृप्ती कोठारी, भारतीय जैन संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन, गजानन सरस्वत, धनराज काबिलिये, श्री. देसरडा , अजित भालेराव, प्रा.



डॉ. बी. जी. श्रीरामे, श्री. ठाकूर, डॉ. सचदेव यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांचे मान्यवरांनी कौतुक करून विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा जागृत करणारे उपक्रम राबविले जात असल्याबद्दल शाळेचे अभिनंदन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मॅरलीन मनास आणि प्रशासकीय अधिकारी डॉ. प्राजक्ता देवकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनासाठी शिक्षकांनी स्वतः खूप मेहनत घेऊन विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेत त्यांना सहकार्य करत त्यांची जिज्ञासा आणि सर्जनशीलता वृद्धिंगत करण्यासाठी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल शाळा व्यवस्थापनाच्या वतीने शिक्षकांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. उद्घाटनपर भाषणात शाळेचे अध्यक्ष विनयकुमार कोठारी म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होणे आवश्यक आहे. विज्ञान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे आणि नवीन संशोधन व नवकल्पनांमुळेच समाजाचा विकास होतो. विद्यार्थ्यांनी प्रयोगशीलतेला चालना द्यावी, नव्या संकल्पनांचा स्वीकार करावा आणि भविष्यात नाविन्यपूर्ण संशोधन करावे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून त्यांच्यातील वैज्ञानिक जाणीवा अधिक दृढ होईल, असा असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हे दोन दिवशीय विज्ञान प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले असून, शनिवार हा शेवटचा दिवस असून, दुपारी १२ वाजेपर्यंत शहरातील तसेच तालुक्यातील सर्व शाळांनी याला भेट द्यावी, असे आवाहन शाळा व्यवस्थापनाने केले आहे.

# केदारवाकडी येथे भव्य बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा तालुका शिवसेनेच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त केदारवाकडी ता. मंठा येथे शुक्रवार (ता. २८) रोजी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे यांच्या हस्ते झेंडी दाखवून करण्यात आले.या स्पर्धेला बैलगाडा प्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, माजी उपसभापती किसनराव मोरे, राजेभाऊ कव्हळे, संकेत साखरे यांची उपस्थिती होती. या स्पर्धेमध्ये जालना जिल्ह्यासह चिखली, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, परभणी, मराठवाडा व मराठवाडा बाहेरील स्पर्धकांनी भाग घेतला.या स्पर्धेमध्ये पंचकमिटी म्हणून उद्धवराव कव्हळे, श्रीनिवास कव्हळे, महादेव कव्हळे,शिवाजी कव्हळे, रमेश कव्हळे, बंडू बिडवे, राहुल कव्हळे, गुलाब कव्हळे, बाळू कव्हळे, पवन कव्ह ळे, भाबट, बोराडे, आगे, राठोड यांच्यासह अनेकांनी काम पाहिले. भव्य बैलगाडा शर्यत पाहण्यासाठी बैलगाडा प्रेमींनी मोठी गर्दी केली होती. स्पर्धा यशस्वीतेसाठी ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# रोटरी रेनबोतर्फे महिला दिनानिमित्त रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

विविध सामाजिक कार्यामध्ये सतत अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

महिलांचे स्वास्थ्य आणि त्याचे महत्त्व लक्षात घेऊन तपासणी व्हावी, महिलांमध्ये याबद्दल जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती क्लबचे अध्यक्ष महेश माळी यांनी दिली. नवीन आणि जुना जालन्यातील विविध हॉस्पिटलमध्ये ६ ते मार्च ८ मार्चदरम्यान लिपिड प्रोफाइल, ब्लड शुगर, एचबी, दंतचिकित्सा, बोन डेन्सिटी, बी एमआय इत्यादी तपासण्या केल्या जातील. ही स्पर्धा २५ ते ४०, ४० ते ६० आणि ६० वर्षापुढील अशा तीन वयोगटात घेतली जाणार आहे. स्पर्धा सर्व महिलांसाठी खुली असून, ५ मार्चपर्यंत नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणीसाठी नवीन जालना भागातील सॅफरॉन हॉटेल, साई डायग्नोस्टिक (डॉ. साबू) आणि जुना जालना भागातील टाऊन हॉलजवळील अथर्व डेंटल क्लिनिक, जालना येथे संपर्क साधावा. स्पर्धेतील विजेत्यांना एका भव्य समारंभात आकर्षक रोख बक्षिसे व ट्रॉफीज देण्यात येतील. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे, अशी माहिती क्लबचे सचिव गौरव करवा यांनी दिली. या उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख म्हणून डॉ. आरती मंत्री, रो. नेहा पाटणी, रो. आरती भक्कड व रो. डॉ. ममता मुंदडा काम पाहत आहेत. स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त महिलांनी सहभाग घ्यावा असे आवाहन रोटरी रेनबो क्लबच्यावतीने करण्यात आले आहे.

# हिंगोलीत भारतीय जनता पक्षाचा पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा

## माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी केंद्रीयमंत्री दानवे यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मार्च**

येथील आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या यमुना निवासस्थानी भारतीय जनता पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोक चव्हाण आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, माजी आ. गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, उद्योग आघाडीचे सचिव मिलींद यंबल, डॉ विठ्ठल रोडगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी भारतीय जनता पक्षात संघटनाला महत्व आहे. जेवढे संघटन मजबुत तेवढा पक्ष मजबुत असतो. केवळ पदाधिकारी असून चालणार नाही तर त्यासाठी पक्षाचे संघटनही मजबुत असावे लागते. यासाठी भारतीय जनता पक्षातील कार्यकर्त्यांने पक्षाचे विचार, केंद्र व राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचवून प्रत्येक घटकाला या योजनांची फायदा मिळवून देण्याचे काम येत्या काळात केले पाहीजे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वत: ला पक्षाचा कार्यकर्ता म्हणून संबोधतात. त्यामुळे भारतीय जनता पक्षात कार्यकर्त्याला जास्त महत्व आहे.

यावेळी बोलतांना माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी हिंगोली जिल्ह्यात भाजपचे संधटन मजबुत असून आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या नेतृत्वात पक्ष मजबुत होत आहे. यासाठी पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्ष संधटन मजबुत करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या लोककल्यणकारी योजना गरजवंतांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले पाहीजे. हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी सहकार क्षेत्रात विकास होणे गरजेचे आहे. यासाठी मी केंद्र व राज्य पातळीवर पाठपुरावा करून हिंगोली जिल्ह्याचा विकास करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यार्वेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण म्हणाले.

यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यर्त्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. यावेळी मोठ्या संख्येने जिल्ह्यातील भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जलसंपदाच्या बैठकीत सिंचनाच्या मागण्यांकडे लक्ष वेधले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मार्च**

जलसंपदा विभागाच्या ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प, विष्णुपुरी प्रकल्प, पूर्णा प्रकल्प कालवा सल्लागार समितीची बैठक छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत राज्यमंत्री हेमंत पाटील यांनी डेरला, विष्णुपुरी प्रकल्प, पैनगंगा नदीपात्रात सोडण्यात येणारे पाणी, येलदरी कालवा आणि हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष याबाबत प्रश्न उपस्थित करून तात्काळ हे पूर्ण करावेत अशी मागणी केली.

नांदेड जिल्ह्यातील डेरला लिफ्ट प्रकल्पासाठी १२ वर्षांपूर्वी ७५ कोटी रूपये खर्च केले व कंत्राटदराने सर्व पैसे उचलून घेतले परंतु अद्यापपर्यंत या भागातील शेतकऱ्यांना पाण्याचा एक थेंबही मिळालेला नाही. याबाबत प्रश्न उपस्थित करून लक्ष वेधले तसेच विष्णुपुरी प्रकल्पातून शेतकऱ्यांना शेतीसाठी चार वेळा पाणी सोडण्यात यावे. पैनगंगा नदीमध्ये पिण्याच्या पाण्याची यापूर्वी करण्यात आलेली तरतूद अपुरी आहे. उन्हाळ्यात नदी काठच्या गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते त्यामुळे हि पाण्याची तरतूद आता १.२५ वरून २ टीएमसी करण्यात यावी. व फेब्रुवारी व मे महिन्यात उनकेश्वर पर्यंत पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी राज्यमंत्री हेमंत पाटील यांनी केली.

पैनगंगा नदीवर मंजूर झालेले सात बंधारे लवकरात लवकर पूर्ण करावेत. अशी मागणी केल्यांनतर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही मागणी मान्य करत हे सातही बंधारे येत्या २ वर्षात पूर्ण करून यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असे आश्वासन दिले. हिंगोली जिल्ह्यातील येलदरी धरणातून कालवा काढुन जास्तीत जास्त लाभ हा हिंगोली, सेनगाव तालुक्यांना व्हावा यासाठी मंजुरी देण्यात आली होती. आणि याबाबतचे जे सर्वेक्षण करण्यात येणार होते ते पूर्ण करण्यात यावेत. तसेच हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी मंजूर करण्यात आलेले ३०० कोटी रुपये तात्काळ देण्यात यावेत. पैनगंगा नदीतून जाणाऱ्या डाव्या व उजव्या कालव्यांची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी आदी बाबींकडे बैठकीत लक्ष वेधण्यात आले.

# बालकांची आरोग्य तपासणी अत्यंत गरजेची- आ. मुटकुळे

**तभा वृत्तसेवा**
**हिगोली, २ मार्च**

बालकांची आरोग्य सदृढ असेल तर त्याचे मनही सदृढ होईल. त्यामुळे त्याचे अभ्यासात मन लागेल आणि प्रगतीची दारे आपोआपच उघडतील. बालकांच्या सदृढ आरोग्यासाठी मोफत आरोग्य तपासणी अत्यंत महत्वाची असून पालकांनी त्यांच्या पाल्यांची आरोग्य तपासणी करणे नितांत आवश्यक असल्याचे मत भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी व्यक्त केले.




जिल्ह्यात पाचही तालुक्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या विशेष तपासणी मोहीमचे जिल्हास्तरीय उद्घाटन आ. तान्हाजाराव मुटकुळे यांचेहस्ते दि १ मार्च रोजी येथील सरस्वती विद्या मंदिर शाळेत करण्यात आले.

यावेळी जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ नितीन तडस, प्रभारी जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ मंगेश टेहरे, बालरोग तज्ञ डॉ गोपाल कदम, शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, वैद्यकीय अधिकारी डॉ बालाजी भाकरे, डॉ पांडुरंग फोपसे, डॉ फैजल खान, मुख्याध्यापिका वंदना सोविएतकर, कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर चौधरी, लक्ष्मण गाभणे, ज्ञानोबा चव्हाण, डॉ शिवाजी विलसकर, डॉ विनायक चुकेवार, डॉ कैलास पवार, डॉ सारीका डुकरे, डॉ सुशमा टाक, डॉ हिंगोले, वागोळे, घुगे, परदेशी, अग्रवाल आदींची उपस्थिती होती.



**हिंगोली- स्व ओमप्रकाश देवडा यांचेजीवनावर आधारीत सत्य संकल्पाचा प्रवास या गॅलरीचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, आरबीआयचे संचालक, बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा आदी.**


## संक्षिप्त वृत्त

### पवार पब्लीक स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन



हिंगोली- येथील पवार पब्लिक स्कूल येथे विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनात इयत्ता पहिली ते नववी मधील बहुतांश विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच विद्यार्थ्यांनी आपापल्या इयत्तेनुसार वेगवेगळे विज्ञानाचे मॉडेल व फलक तयार केले होते. याप्रसंगी पालकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. याप्रसंगी शाळेचे अध्यक्ष प्रणव शिवाजीराव पवार, कोमल अग्रवाल, केसी सोली, दिपाली राऊत, सय्यद फिजा चैताली विचेवार, अश्विनी बोराळकर, स्वाती कल्याणकर गजानन वानरे, योगेश थोरात, जोबीन जॉर्ज, सचिन इंगोले, विकास महानोर, वैभव काळे, छाया धनवे, छाया कल्याणकर, शशिकला मोरे आदींची उपस्थिती होती.

### काल्याच्या किर्तनाने महाशिवरात्रीची सांगता



हिंगोली- औंढा नागनाथ महाशिवरात्रीनिमित्त येथे सुरू असलेल्या कार्यक्रमांची सांगता रवीवारी (ता.२) मार्चला ह भ प नामदेव महाराज ढवळे चारठाणकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे, विश्वस्त अँड सुनील भूक्तार, देवस्थानचे अधिक्षक वैजेनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, नगराध्यक्ष एस पी कनकुटे, उपनगराध्यक्ष अनिल देव,मा.उपसचिव उत्तमराव देशमुख, बबन सोनुने, कृष्णा पाटील, रामप्रसाद उदगिरे, नागेश माने, गणेश उदगिरे, बाळू देशमुख आदींची उपस्थिती होती. ह भ प नामदेव महाराज ढवळे चारठाणकर म्हणाले, देवाच्या सानिध्यात राहायचे असेल तर पहिली आई वडिलांची सेवा करणे गरजेचे आहे.माणसाने जीवनामध्ये अहंकार, भेद विसरून जीवन कसे आनंदमय करायचे, ते ठरवावे. समाजामध्ये आपला अभिमान जागृत होता कामा नये. जीवनामध्ये आपण सदैव आनंदी राहणे गरजेचे आहे. याप्रसंगी मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती.

# ओमप्रकाश देवडा पिपल्स को. ऑप. बँकेच्या नवीन इमारतीचे थाटात उद्घाटन, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, रावसाहेब दानवे यांची उपस्थिती





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मार्च**

येथील तिरूपती नगरातील ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँकेचे दि १ मार्च रोजी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्व ओमप्रकाश देवडा यांच्या पूतळ्याचे अनावरण आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांच्याहस्ते तसेच सत्य संकल्पाचा प्रवास या गॅलरीचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचेहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी राज्यमंत्री ललीत गांधी, राज्यमंत्री हेमंत पाटील, खा नागेश पाटील आष्टीकर, खा अजित गोपछडे, लक्ष्मी दास, उदय जोशी, मिलींद काळे, ज्ञानचंद गर्ग, अजय ब्रम्हेचा, आ तान्हाजीराव मुटकुळे, आ. प्रज्ञा सातव, आ. संतोष बांगर, आ. राजू नवघरे, आ. जयश्री चव्हाण, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुकुंद सावजी, संचालक दिलीप चव्हाण, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी खा शिवाजीराव माने, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी आ. गजनन घुगे, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा आदींची उपस्थिती होती.

यानिमित्त मराठवाडा अर्बन बॅक्स असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर यांचे मार्फत अर्बन बँकासाठी प्रशिक्षण शिबीरात आरबीआयचे संचालक सतीश मराठे, मिलींद काळे, प्रभात चतुर्वेदी मार्गदर्शन यांनी मार्गदर्शन केले. तसेच संध्याकाळी बँकेचे संचालक, पदाधिकारी यांचा सत्कार तसेच संगीत रजनीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि २ मार्चला ओमप्रकाश देवडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त मोफत आरोग्य शिबीर, त्यानंतर हभप अमोल बोधले यांचे किर्तन पार पडले असून दि ३ मार्च ला सकाळी मोफत आरोग्य शिबीर तसेच भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा, बँकेचे संचालक विठ्ठलदास मुंदडा, शशीकांत दोडल, ज्ञानेश्वर मामडे, राजेश अग्रवाल, संजय देवडा, आशिष काबरा, गजानन देशमुख, एम एम बुद्रुक, आशिष काबरा, अजित बज, राजु मुदीराज, जनकराज खुराणा, डॉ सचिन बगडीया यांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे, सरव्यवस्थापक शशीकांत कंदी, उप सरव्यवस्थापक सुधीर मुळे, सहा. सरव्यवस्थापक ज्ञानदेव घुगे, सहा सरव्यवस्थापक श्रीराम माळोदे, आरोग्य शिबीर समितीचे नंदकिशोर भालेराव, आशिष पिंगळकर, संजय बोहरा, दयाल यादव यांच्यासह सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्याला बँकेचे ग्राहक, सभासद, ठेवीदार व हिंतचिंतकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे यांनी केले आहे.

# लाखो भाविकांच्या उपस्थितीत औंढा नागनाथ येथील रथोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मार्चे**

'हर हर महादेव, बम बम भोले, नागनाथ महाराज की जय'च्या जयघोषामध्ये शनिवारी (ता. १) मार्चला रात्री महाशिवरात्री यात्रेनिमित्त नागनाथ मंदिरामध्ये लाखो भाविकांच्या उपस्थितीत रथोत्सव साजरा झाला.महाशिवरात्रीच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण असणारा रथोत्सव असल्याने दुपारपासूनच भाविकांची गर्दी होती.



फुलांच्या माळा आणि दिव्यांद्वारे सजावट केलेल्या रथामध्ये श्री नागनाथांची उत्सवमूर्ती ठेवण्यात आली होती. रात्री दहाच्या सुमारास मंदिराभोवती रथाच्या प्रदक्षिणेला सुरवात झाली. अशा पाच प्रदक्षिणा झाल्या. यावेळी उपस्थित भाविकांनी 'हर हर महादेव, ओम नमः शिवाय, नागनाथ महाराज की जय, बम बम भोले'चा गजर केला. नागनाथ देवस्थानचे सल्लागार तथा आमदार संतोष बांगर,देवस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे यांच्या हस्ते 'श्रीं'ची पूजा झाली.अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील,नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव,नायब तहसीलदार लता लाखाडे,नगराध्यक्ष सपना प्रदीप कनकुटे,उपनगराध्यक्ष अनिल देव, यांच्यासह विश्वस्त अँड सुनील भूक्तार, मुख्यपुजारी श्रीपाद भोपी, नारायण भोपी, आदित्य भोपी, शेखर भोपी, नागेश शिरसागर, दत्ता मठाचे महंत शाम गिरी महाराज, मंहत सुरेश गीरी महाराज,दत्त मठाचे उत्तराधिकारी राजेश गिरी महाराज, देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ,मंदिर सुरक्षा गार्ड प्रमुख बबन सोनुने, नागेश गोरे दीपक कोळी योगेश गोरे आदीसह जवळपास दोन लाखांहून अधिक भाविक उपस्थित होते.

दरम्यान, १९४८ मध्ये झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला होता. यात गणपत ऋषी, शंकर पाठक, रंगनाथ सुरवाडकर, तसेच २०११ मध्ये सतीश पाठक यांचे रथ मिरवणुकीत अपघाती निधन झाले होते. त्यांनाही यावेळी आदरांजली अर्पण करण्यात आली. रथोत्सवात भजनी मंडळ व बँडपथक तसेच नागेश्वर शाळेमधील विद्यार्थी ढोल-ताशांसह सहभागी झाले होते. उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे, पोलिस निरीक्षक जी एस राहिरे, सपोनी अरुण नागरे, पोलीस उपनिरीक्षक अफसर पठाण, पोलीस उपनिरीक्षक अमोल इंगोले, पोलीस उपनिरीक्षक शेख खुद्दूस, पोलीस उपनिरीक्षक पंजाबराव थिटे, जमादार वसीम पठाण, संदीप टाक, रविकांत हरकाळ, यशवंत गुरुपवार, सुभाष जयताडे, किशोर पारिसकर, अमोल चव्हाण,माधव सूर्यवंशी यांच्यासह दंगा नियंत्रण पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, राज्य राखीव बल दोन प्लाटून, होमगार्ड, पोलीस कर्मचारी आदींनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# धारूर तालुक्यातील पिंपरवडा येथे ४२ गोण्या अफू पकडला



### पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ मार्च**

दि.१ मार्च २०२५ रोजी १८. १० वाजण्याचे सुमारास आरोपी नामे रामहरी कारभारी तिडके वय ४२ वर्षे रा पिंपरवडा ता.धारूर जि. बीड त्याचा मालकीचे शेत गट नं ३३ मध्ये मौजे पिंपरवाडा ता धारूर जि. बीड येथेमिळालेल्या गोपनीय माहिती प्रमाणे छापा टाकला असता यातील आरोपी त्याचे मालकीचे शेत गट नं ३३ मधील शेतात अफु या अंमली पदार्थच्या झाडाची बेकायदेशीर विनापरवाना व्यापा व्यावसायीक विक्रीच्या उद्देशाने लागवड करुन अंमली पदार्थ अफुची पांढरी शुभ्र फुले व त्यास गोलाकार बोंड असलेली हिरवी व पिंपळसर पाने असलेली झाडे मुळासह ज्याना ४२ गोन्यामध्ये टाकुन त्याचे वजन केले असता गोन्यासह एकून वजन ५४० किलो ७५९ ग्रॅम येवढे असुन प्रती किलो ८०,०००/- रूपये प्रमाणे त्याची एकूण किंमत ४,३२,६०,७२०/- रूपये किंमत अंदाजे अंमली पदार्थ अफूच्या झाडा लागवड करुन स्वताच्या आर्थिक फायद्यासाठी संगोपन करत असताना मिळुन आला म्हणुन त्याचे विरुध्द पोलीस स्टेशन धारूर गु र न ५७/२०२५ गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधिनीयम १९८५ चे कलम ८ (ल), १५, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करुन करण्यात आला आहेत.

सदरची कामिगरी ही मा.श्री.नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, मा. सचिन पांडकर अपोअ बीड, मा. श्रीमती चेतना तीडके अपोअ अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि .उस्मान शेख. स.पो. नि . विजयसिंग जोनवाल, पो.उप. नि.महेश विघ्ने ग्रेड.पो.उप. नि .हनुमानखेडकर, पो. ह तुषार गायकवाड ,महेश जोगदंड, भागवत शेलार, पोअ. बप्पासाहेब घोडके ,रीळ संजय जयभाये सर्व नेमणूक स्था.गु.शा.बीड स.पो.नी देविदास वाघमोडे ,रीळ भुसारी व धारूर पोलिस स्टेशन येथील स्टाफ यांनी मिळून केली आहे.

# रोटरी क्लबच्या रोटरी टॅलेंट सर्च परीक्षेला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद

### १७०० विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ मार्च**


रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी मंगलनाथ मल्टीस्टेट आणि यशवंत ग्रुप ऑफ एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तोंड ओळख व्हावी या उद्देशाने घेण्यात आलेल्या रोटरी टॅलेंट सर्च परीक्षेस माजलगावमध्ये भरघोस प्रतिसाद मिळाला या परीक्षेत तिसरी ते नववीच्या १७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली.



तिसरी ते पाचवी आणि सहावी ते नववी या दोन विभागात घेण्यात आलेल्या या परीक्षेत माजलगाव शहरातील बहुसंख्य शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी चे अध्यक्ष रवींद्र कानडे, सचिव लता जोशी आणि प्रोजेक्ट चेअरमन निरंजन सर यांच्या मार्गदर्शनातून या परीक्षा झाल्या. विद्यार्थ्यांमधील गुणवत्तेचा शोध घेऊन त्यांना स्पर्धा परीक्षेत बसण्याचा आणि त्यात यश मिळवण्याचा आत्मविश्वास लहान वयातच निर्माण करून देणे हा या परीक्षेचे उद्देश होता. या परीक्षेसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात आले नाही. यशवंत विद्यालय माजलगाव सक्सेस पब्लिक स्कूल माजलगावचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच मंगलनाथ मल्टीस्टेटचे कर्मचारी, बुखारी शाळेतील शिक्षक वृंद यांनी ही परीक्षा यशस्वी होण्यासाठी मोलाचे योगदान दिले. यावेळी राजेश देशपांडे, विनू रतनपारखी, पंडित तिडके, सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य शेख अनवर हे उपस्थित होते. परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर करण्यात येईल अशी माहिती प्रोजेक्ट चेअरमन निरंजन सर यांनी दिली.

# प्रकाश बोरगावकर यांची पर्यावरण दूत म्हणून निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ मार्च**



तालमार्तंड प्रकाशजी बोरगावकर यांची पर्यावरण दूत म्हणून निवड करण्यात आली आहे.राज्य शासनाद्वारे पृथ्वी,जल,तेज,वायू आणि आकाश यावर आधारित पर्यावरण संरक्षण करीत 'माझी वसुंधरा अभियान ५.० ची सुरवात केलेली असून प्रकाशजी बोरगावकर हे स्वतः, परिवारातील सदस्य,मित्र,नातेवाईक यांना सोबत घेऊन स्वच्छतेसोबतच निसर्ग बचाव,पर्यावरण, वृक्षारोपण असे अनेक असामान्य कार्य करतात.

त्यांच्या विविध घटकातील सामाजिक,सांस्कृतिक, शैक्षणिक व स्वच्छते आणि स्वयं मदतीने केलेल्या अतुलनीय कार्याची व्याप्ती पाहता माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत अंबाजोगाई शहरातील नागरिकांमध्ये व्यापक व्यक्तिगत स्वछता, नदी स्वछता,श्रमदान कचरा विलीगिकरण घरोघरी ओल्या कचऱ्यापासून कम्पोस्ट खत बनवणे,वृक्ष लागवड व संगोपन,नवी करनिय ऊर्जा स्तोत्रांचा वापर करणे, पाण्याची बचत,पर्यावरण संतुलन व संवर्धन आदी बाबत जनजागृती करिता अंबाजोगाई नगरपरिषद मार्फत पर्यावरण दूतम्हणून निवड करण्यात आली आहे.त्यांची कार्यक्षता आणि पर्यावरण क्षेत्रातील योगदानाबद्दल गौरव म्हणून ही निवड करण्यात आली आहे.

# दै शिवजागर व विश्वनाथ फाउंडेशनच्या महाराष्ट्र रत्न पुरस्काराने कविवर्य भागवत मसने सन्मानित

## पुणे येथे सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांच्या हस्ते संपन्न झाले महाराष्ट्र रत्न पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ मार्च**

दैनिक शिवजागर व विश्वनाथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा महाराष्ट्र रत्न पुरस्कार अंबाजोगाई शहरातील सुप्रसिद्ध कवी तथा वात्रटिकाकार भागवत मसने यांना सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड (येसूबाई) यांच्या हस्ते नुकतेच दि २८ शुक्रवार रोजी सावित्रीबाई फुले भवन, पुणे येथे प्रदान करण्यात आला. या गौरव सोहळ्यात महाराष्ट्रात विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या विविध मान्यवरांना सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड( 'येसूबाई' ची भूमिका साकारलेल्या) यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

श्री योगेश्वरी नूतन विद्यालयातील सहशिक्षक कवी, वात्रटिकाकार भागवत मसने यांनी आजपर्यंत सामाजिक विषयावर विविध पथनाट्य लिहून ते विद्यार्थ्यांकडून विविध ठिकाणी सादर केले आहेत. तसेच सामाजिक विषयावर एकांकिका लिहून त्याचे दिग्दर्शन करून शाळा महाविद्यालयासह आकाशवाणी बीड वर देखील सादर केल्या आहेत. त्याचबरोबर भागवत मसने यांनी तालुका, जिल्हा, विभाग, राज्य पातळीवर वक्तृत्व तथा वादविवाद स्पर्धेचे उत्तम असे परीक्षण देखील केले आहे.



भागवत मसने याना महाविद्यालयीन जीवनापासूनच वात्रटिका लिहिण्याचा छंद जडला आहे. दिवसेंदिवस त्यांच्या वात्रटिका रसिकांना आवडू लागल्या. त्यामुळे गेली २० वर्षांपासून विविध विद्यालय, महाविद्यालय तथा इतर ठिकाणी प्रमुख अतिथी म्हणून त्यांना आमंत्रित केले जाऊ लागले आहे.अनेक विद्यालय तसेच महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटक तथा प्रमुख पाहुणे म्हणून त्यांना आमंत्रित करण्यात येत आहे. सलग दीड ते दोन तास मनोरंजनातून विद्यार्थ्यांचे व समाजाचे प्रबोधन करण्यात मसने यशस्वी झाले आहेत. काही ठराविक विषयावर काही गाणी देखील मसने यांनी लिहिले आहेत. जे समाजातील वैविध्य व वैषम्यावर बोट ठेवून कांही कविता व गाणी तसेच वात्रटिका सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करण्यात यशस्वी होत आहेत.माजी केंद्रीय कृषिमंत्री ना. शरदचंद्र पवार, माजी उपमुख्यमंत्री कै. गोपीनाथराव मुंडे यांच्या राजकिय तथा सामाजिक कार्यक्रमासोबत विविध कवी संमेलनाचे बहारदार असे यशस्वी व सुश्राव्य असे सूत्रसंचालन त्यांनी संपन्न केले आहे. या सर्व बाबींचा विचार करून दैनिक शिवजागर व विश्वनाथ फाउंडेशन च्या वतीने भागवत मसने यांना महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड, प्रसिद्ध दिग्दर्शक ओमकार माने, मिसेस ग्लोबल इंडिया स्मिता चावडा आदी उपस्थित होते. हा पुरस्कार स्वीकारताना श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे जेष्ठ सल्लागार प्राध्यापक एम. एस. लोमटे व जय हिंद ग्रुप चे अध्यक्ष प्रा. मेजर एस पी कुलकर्णी हे उपस्थित होते.

# ई पीक पाहणी करण्यासाठी संपूर्ण जिल्हाभर महसूल विभागाची उन्हातान्हात धावपळ

### ई पीक पाहणी शेतकऱ्यांच्या हिताची- तहसीलदार शेळके

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ मार्च**

बीड जिल्ह्यात सध्या ई पीक पाहणी, ग्रीस्टॅक इत्यादी कामाची लगबग पाहायला मिळत आहे. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमी दक्ष असतात. शेतकऱ्यांना वेळेवर बि बियाणे, खते मिळावी, अनुदान रकमा वेळेत प्राप्त व्हाव्यात, विविध योजनांचे लाभ मिळावेत यासाठी ते कृषी विभाग, पंचायत विभाग, महसूल विभागाचा आढावा घेत असतात. रब्बीची ई पीक पाहणी करण्याची शेवटची तारीख २८ फेब्रुवारी होती. ती आता २ मार्च पर्यंत करता येणार आहे.

त्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी वेळोवेळी उपविभागीय अधिकारी , तहसीलदार यांचा आढावा घेतला . राज्यात एकूण झालेल्या पिकपाहणीचा विचार करता बीड जिल्ह्याचा चौदावा क्रमांक आहे . तथापि जिल्ह्यात जास्तीत जास्त ईपीक पाहणी व्हावी , ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावे . यासाठी संपूर्ण महसुल विभाग प्रयत्नशील असल्याचे दिसून आले .

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी बीड सह गेवराई आणि शिरूर तालुक्यात बैठका घेऊन वेळोवेळी सूचना देऊन व ग्रीस्टॅकची कामे वेळेवर होतील यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते .



शेतकऱ्याने पेरलेल्या पिकाची अचूक नोंद शासन दप्तरी व्हावी आणि शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा व्हावा या दृष्टीने ' ई-पीक पाहणी ' प निर्माण करण्यात आले आहे . या माध्यमातून शेतकऱ्याने कोणत्या गटामध्ये कोणते पिक घेतले आहे याची नोंद तर होणारच आहे , शिवाय ते ठिकाण अक्षांश / रेखांशमध्ये नोंद केले जाणार आहे.ई-पीक पाहणी कशी करायची ? : - शेतकऱ्याने स्वत: अथवा सहायकाने शेतातल्या पिकांची नोंद ऑनलाईन पद्धतीनं सातबारा उताऱ्यावर नोंदवणे याला ई-पीक पाहणी असं म्हटलं जात . गेल्या ४ वर्षांपासून महाराष्ट्र सरकार हा उपक्रम राबवत आहे . पिकांची नोंद करण्यासाठी सगळ्यात आधी ई पीक पाहणी हे प डाऊनलोड कराव लागत . त्यासाठी प्ले-स्टोअरवर जाऊन तिथ ई पीक असं सर्च करावे . त्यानंतर इन्स्टॉल वर क्लिक करायच . टप्प्या टप्प्याने पुढील नोंदी कराव्या.ई-पीक पाहणीचे फायदे काय ? : - ई - पीक पाहणी करताना दिलेली माहिती पुढील प्रकारचे लाभ देण्यासाठी वापरली जाते. एम एस पी मिळवण्यासाठी - तुम्हाला जर तुमचा शेतमाल किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत विक्री करायचा असेल तर त्यासाठीही तुमच्या संमतीनं हा डेटा वापरला जाऊ शकतो . पीक कर्जाच्या पडताळणीसाठी - तुम्ही ज्या पिकावर कर्ज घेतलंय , तर तेच पिक लावलं का , याची बँक हा डेटा पाहून पडताळणी करू शकते . १०० च्या वर बँका आजघडीला हा डेटा वापरत आहेत . पीक विमा योजनेच्या लाभासाठी - पीक विम्यासाठी अर्ज करताना नोंदवलेलं पीक आणि ई-पीक पाहणीत नोंदवलेलं पीक , यात तफावत आढळल्यास पीक पाहणीतील पीक अंतिम गृहित धरलं जात . नुकसान भरपाईसाठी - नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचं नुकसान झाल्यास भरपाई देण्यासाठी हा डेटा वापरला जातो .

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची मागील आठ दिवसापासून या कामाचा मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केल्याचे दिसून येत आहे . त्यांनी स्वतंत्र आदेश काढून २४ ते २८ तारखेपर्यंत सर्व नायब तहसीलदार , सर्व मंडळ अधिकारी , सर्व ग्राम महसूल अधिकारी म्हणजेच तलाठी यासह ग्राम महसूल सेवक म्हणजे कोतवाल यांनी ई पीक पाहणी आणि ग्रीस्टॅकच्या कामासाठी क्षेत्रीय स्तरावर गावोगावी फिरून काम करण्याबाबत लेखी आदेश काढले . दोन दिवस मुदत वाढल्यामुळे शुक्रवारी २८ तारखेला सायंकाळी बैठक घेऊन पुन्हा दोन दिवसात ईपीक पाहणी वर पूर्ण लक्ष देण्यासाठी मंडळ अधिकारी , तलाठी यांना आवाहन केले.त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , ग्राम महसूल सेवक हे उन्हातान्हात ईपीक पाहणी करत असल्याचे चित्र दिसत आहे .तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांनाही आवाहन केलेले आहे की ईपिक पाहणीचे फायदे लक्षात घेता , त्यांनी सुद्धा महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांना सहकार्य करावे , ईपीक पाहणी करून घ्यावी तसेच ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत फार्मर आयडी काढून घेण्याबाबतही त्यांनी आवाहन केलेले आहे.

तहसीलदारांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून नायब तहसीलदार सुहास हजारे , सुरेंद्र डोके , प्रशांत जाधवर , प्रशांत सुपेकर हे गावोगावी शेतात फिरत असल्याचे चित्र दिसत आहे.२८ फेब्रुवारी च्या अहवालाचा विचार केला असता सर्वाधिक ई पीकपाहणी अंबाजोगाई तालुक्यात ४१ टक्के इतके दिसून आली . तर सर्वात कमी पाटोदा तालुक्यात झाली असल्याचे दिसले . दोन मार्चपर्यंत ई पिक पाहण्याचा कालावधी वाढविण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांनी सुद्धा ईपिक पाहणी साठी महसूल विभागास सहकार्य करणे आवश्यक आहे .ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत बीड जिल्ह्यात सर्वाधिक अंबाजोगाई तालुक्यात ७० टक्के शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घेतलेले आहेत . बीड तालुक्याचा विचार करता बीड तालुक्यात एकूण खातेदार एक लाख वीस हजार सहाशे नव्वद इतके असून त्यापैकी पीएम किसान योजनेचे लाभार्थी ५९५३० इतके आहेत . ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत आतापर्यंत ३४ हजार ६६५ शेतकऱ्यांनी म्हणजेच ५९% शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घेतलेले आहेत . इतर शेतकऱ्यांनी सुद्धा फार्मर आयडी काढावे आणि विविध लाभ घ्यावेत असे आवाहन बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले आहे .

# गोकुळ शिशुवाटिकेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ मार्च**



दीनदयाल शोध संस्थान संचलित गोकुळ शिशु वाटिकेत वार्षिक २०२४-२५ स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. सर्वप्रथम दीनदयालजी उपाध्याय व भारतरत्न नानाजी देशमुख व नटराज्याच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. शाळेच्या सचिव डॉ.सीमाताई जोशी यांनी प्रास्ताविक केले. तसेच गोकुळचे वार्षिक अहवाल लेखन सौ मधुरा ताई गुळवेलकर यांनी केले. प्रमुख पाहुण्या म्हणून आलेल्या चिंचोलकर ताईने मुलांना व पालकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप गोकुळ समिती सदस्य ॲड.अर्चनाताई तुंगार यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात ओ माय फ्रेंड गणेशा या गणेश वंदनाने झाली. त्यानंतर दीनदयाल शोध संस्थांच्या कार्यकर्त्यांनी बच्चे मन के सच्चे या गाण्याचे सादरीकरण केले. या कार्यक्रमात विविध प्रकारच्या गाण्यांचे नृत्य होते त्यात कोळीगीत, माऊली माऊली, शेतकरी गीत, आरंभ हे प्रचंड भांगडा गीत, चांद तारे, टन टन घंटी बजे,देशभक्तीपर गीत, चिऊताई चिऊताई, छोटे छोटे तमाशे इत्यादी वेगवेगळ्या गाण्याचे प्रदर्शन करण्यात आले. २०२४-२५ वर्ष हे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० जन्मशताब्दी वर्ष असल्यामुळे अहिल्याबाई होळकरांचे पण गाण्यावर सादरीकरण करण्यात आले. शिवकालीन सादरीकरण लाठीकाठी व तलवारबाजी देवराज गुळवेलकर या प्रल्हाद गटातील विद्यार्थ्यांनी सादर केले. तसेच राजमुद्रा मृणाल पवार हिने सादर केली. शिवगर्जना श्रीपाद रत्नपारखी याने सादर केले. अशाप्रकारे विविध सादरीकरणातून कार्यक्रम उत्साहात घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितलताई कुलकर्णी यांनी केले.आभार प्रदर्शन सौ स्वातीताई देशपांडे यांनी केले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन गोकुळ समिती सदस्य गंगाधर देशमुख सर, सुनंदाताई कुलकर्णी, रवींद्र देशमुख सर ,दहिवाळ सर, व तसेच नानाजी देशमुख विद्या मंदिर मुख्याध्यापिका अर्चनाताई मोराळे व गोकुळ शिशुवाटिका प्रमुख सौ स्नेहलताई देशपांडे यांनी केले. या कार्यक्रमाला सहकार्य दीनदयाल शोध संस्थानचे सर्व कार्यकर्ते व कर्मचारी यांचे लाभले.

# गेवराईच्या इरा स्कूलमध्ये भरला ज्ञानाचा महाकुंभ

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ मार्च**



गेवराई शहरातील इरा स्कूलमध्ये विज्ञान दिनाच्या औचित्य साधून *'नॉलेज हब'* या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान, गणित या विषया सोबतच मराठी, हिंदी, सामाजिक शास्त्रे, कॉम्प्युटर, जीके यासारख्या विषयाची सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे या उद्देशाने इरा स्कूलमध्ये 'नॉलेज हब' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उदघाटन सेवानिवृत्त मुख्याध्यापक व साहित्यिक प्रकाश भुते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष गणेश क्षीरसागर, प्रा. वर्षा क्षीरसागर, आश्विनी कुलकर्णी, श्रीनिवास क्षीरसागर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. वर्षा क्षीरसागर म्हणाल्या कि, 'नॉलेज हब' च्या माध्यमातून विज्ञान, गणित, इंग्रजी, हिंदी, मराठी, कॉम्प्युटर, जीके, सामाजिक शास्त्रे या विषयावरील सखोल ज्ञानाचे प्रदर्शन नव्हे हा ज्ञानाचा महाकुंभ भरवण्यात आला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना सगळ्या विषयाचे ज्ञान प्राप्त होते. ज्ञान, कौशल्य व कृती या त्रिवेणी संगमात विद्यार्थ्यांनी स्वछंद पणे पोहून अधिकाधिक ज्ञान मिळवावे असे आवाहन त्यांनी केले. साहित्यिक प्रकाश भुते यावेळी बोलताना म्हणाले की इरा स्कूल हे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे स्कूल आहे. या शाळेत विद्यार्थ्यांमध्ये सातत्याने जिज्ञासू वृत्ती जागृत व्हावी यासाठी प्रयत्न केले जातात. या शाळेच्या माध्यमातून राबविण्यात आलेले 'नॉलेज हब' हे सर्व विषयाचे प्रदर्शन हे निश्चित नाविन्यपूर्ण आहे. यातून विद्यार्थ्यांच्या ज्ञान वाढवण्यास मदत होणार आहे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार वैशाली कापसे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंदांनी प्रयत्न केले. यावेळी विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध प्रयोग तयार केले होते, त्याचबरोबर गणित विषयाच्या तज्ञाची माहिती विद्यार्थ्यांनी सादर केली. या शिवाय मराठी, इंग्रजी, हिंदी, सामाजिक शास्त्रे, जी के, कॉम्प्युटर या विषयातील सखोल माहिती संकलित करून त्याचे सादरीकरण या नॉलेज हब मध्ये विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. या नॉलेज हबच्या माध्यमातून आपल्या पाल्याने काय केले हे पाहण्यासाठी पालकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.